रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १६ ◆ अंक ९२
www.ramprahar.com
# राम प्रहर
गुरुवार, १९ ऑक्टोबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## मोदी सरकारकडून सहा पिकांच्या ‘एमएसपी’त वाढ



**नवी दिल्ली :** मोदी सरकारने शेतकऱ्यांसाठी मोठा निर्णय घेत दसरा, दिवाळीच्या आधी भेट दिली आहे. सहा रब्बी पिकांच्या एमएसपी म्हणजेच आधारभूत किमतीत म्हणजेच वाढ करण्यात आली आहे. याचा शेतकऱ्यांना फायदा होणार आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बुधवारी (दि. १८) झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. सहा पिकांच्या आधारभूत किमतीत दोन ते सात टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी केंद्र सरकार सातत्याने प्रयत्न करीत आहे. या संदर्भात सरकारने वेगवेगळे महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. याच अनुषंगाने सरकारने विविध पिकांच्या एमएसपीमध्ये वाढ केलेली आहे. आता सरकारने गहू, हरभरा, मसूर, बार्ली, मोहरी आणि सूर्यफूल या सहा पिकांच्या किमान आधारभूत किमतीत वाढ केली आहे.

अंतरंग

‘व्याज परतावा लाभ देण्यासाठी महामंडळांनी नियोजन करावे’/२

धनगर समाजालाही आरक्षण मिळावे -आमदार पडळकर/५

खंडाळा घाटात आता पोलादी हाईट बॅरियर/७

# रायगडात भाजप महायुतीचा खासदार निवडून येईल

## प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा विश्वास

**अलिबाग : प्रतिनिधी**

भाजपच्या कार्यकर्त्यांचा उत्साह पाहून जनतेकडूनदेखील चांगला प्रतिसाद मिळत आहे. त्यामुळे आगामी लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात ४८ पैकी ४५ खासदार भाजप महायुतीचे निवडून येतील. रायगड लोकसभा मतदारसंघातूनदेखील भाजप महायुतीचाच खासदार निवडून येईल, असा विश्वास भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. भाजपतर्फे महाविजय २०२४ अंतर्गत अलिबाग येथे बुधवारी (दि. १८) आयोजित सभेत ते बोलत होते.

या सभेस भाजप मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, माजी मंत्री बाळा भेगडे, दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील, रायगड लोकसभा प्रमुख सतीश धारप, प्रदेश सरचिटणीस विक्रांत पाटील, दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, वैकुंठ पाटील, दिलीप भोईर, ॲड. पल्लवी तुळपुळे, सरचिटणीस ॲड. महेश माहिते, मिलिंद पाटील, अलिबाग तालुकाध्यक्ष उदय काठे, शहराध्यक्ष ॲड. अंकित बंगेरा, सतीश लेले, सुनील दामले, परशुराम म्हात्रे, हेमंत दांडेकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी अलिबाग तालुक्यातील विविध ग्रामपंचायतींच्या सदस्यांसह सुमारे पाच हजार कार्यकर्त्यांनी भाजपत प्रवेश केला. प्रदेशाध्यक्ष बानकुळे यांनी त्यांचे स्वागत केले. **(पान २ वर..)**



## पनवेल महापालिकेबाबत चर्चा करण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या विविध विकासकामांच्या उद्घाटनाची तारीख निश्चित करण्यासाठी तसेच सध्या भेडसावणाऱ्या समस्यांवर उपाय योजण्यासाठी महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची पनवेल-उरण भाजपच्या काही नेत्यांनी नुकतीच भेट घेतली.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, पनवेल शहर भाजपचे अध्यक्ष आणि माजी नगरसेवक अनिल भगत तसेच रायगड जिल्हा भाजपचे सरचिटणीस आणि माजी नगरसेवक नितीन पाटील यांचा उपमुख्यमंत्री फडणवीस यांची भेट घेणाऱ्यांमध्ये समावेश होता.

पनवेल शहराचा विकास आणि सर्वंकष सुधारणा यासह संपूर्ण शहर आणि परिसरातील भागांचाही या विकासात सहभाग करून घेण्यावर या वेळी चर्चा झाली.



## ड्रग्जतस्कर ललित पाटीलच्या मुसक्या अखेर आवळल्या

### सोमवारपर्यंत पोलीस कोठडी

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई पोलिसांनी ड्रग्जचे रॅकेट चालवणाऱ्या फरार आरोपी ललित पाटील याला अखेर अटक केली आहे. ललित पाटील २ ऑक्टोबर रोजी पुण्यातील ससून रुग्णालयातून फरार झाला होता. त्याला सोमवारपर्यंत म्हणजेच २३ ऑक्टोबरपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

ससून रुग्णालयातून पळ काढल्यानंतर ललित पाटील अनेक दिवस नाशिकमध्ये होता. तपास यंत्रणांच्या शोधकार्याला गती येताच ललितने नाशिकमधून पळ काढला. त्यानंतर तो इंदोरला गेला, तिथून सूरतमध्ये गेला आणि पुन्हा नाशिक, धुळे, औरंगाबाद करीत त्याने कर्नाटकात प्रवेश केला. बंगळुरूहून



चेन्नईला जात असताना साकीनाका पोलिसांनी ललितला अटक केली. चेन्नईवरून ललित श्रीलंकेला जाणार होता, अशी माहिती मिळत आहे.

दरम्यान, यावर उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. आता ललित पाटील हातात आला आहे. त्यामुळे अनेकांची तोंडं बंद होणार आहेत, असे सूचक वक्तव्य त्यांनी केले. सर्व दोषींवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले

## पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते आज ग्रामीण कौशल्य विकास केंद्रांचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

तरुणांच्या रोजगार संधीसाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासाला चालना देण्यासाठी राज्यातील ५११ प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केद्रांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते गुरुवारी (दि. १९) दुपारी ४ वाजता ऑनलाईन पद्धतीने उद्घाटन होणार आहे.

सन २०२३-२४च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये वित्तमंत्री यांनी महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत संपूर्ण राज्यभरात ग्रामपंचायत स्तरावर कौशल्य विकास केंद्र सुरू करण्याची घोषणा केली होती. यानुसार संपूर्ण राज्यातील ५११ ग्रामपंचायतींच्या ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण उद्योजकता कौशल्य विकास केंद्रांची उभारणी करण्यात आली आहे. रायगड जिल्ह्यात एकूण १४ ग्रामपंचायतींच्या ठिकाणी ही केंद्र उभारली आहेत.

उद्घाटन सोहळ्यात पंतप्रधान मोदी हे ग्रामीण युवकांशी संवाददेखील साधणार आहेत. प्रत्येक तालुक्यातील निश्चित ठिकाणी जास्तीत जास्त लोकांनी उपस्थित राहून कौशल्य विकासाच्या या नवीन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



**पनवेल : येथील नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टिकोनातून शहर पोलीस ठाण्याच्या वतीने शहरामध्ये गर्दीच्या व महत्त्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. या कॅमेऱ्यांच्या वॉर रूमची महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी पाहणी करून आढावा घेतला. या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहराध्यक्ष अनिल भगत, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत, वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह इतर पोलीस अधिकारी उपस्थित होते.**



# व्याज परताव्यासंदर्भात नियोजन करा

## मंत्री चंद्रकांत पाटील यांचे महामंडळांना निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाकडून आतापर्यंत २३ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना २५ कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेचा व्याज परतावा देण्यात आला आहे. यापुढील काळात लाभार्थ्यांनी व्याज परताव्याचा दावा केल्यानंतर सात दिवसांच्या आत व्याज परताव्याचा लाभ देण्यासाठी महामंडळांनी कालबद्ध नियोजन करावे, असे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा मराठा आरक्षण आणि सुविधांसाठी गठित केलेल्या मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी दिले.



अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाला उच्च व तंत्र शिक्षण मंत्री तथा उपसमितीचे अध्यक्ष श्री. पाटील यांनी भेट देऊन महामंडळाच्या कामकाजाविषयी आढावा घेऊन सविस्तर चर्चा केली. मंत्री श्री. पाटील यांच्या हस्ते सहा हजार लाभार्थ्यांना ४.६५ कोटी रुपयांचा व्याज परतावा ऑनलाईल स्वरुपात वितरीत करण्यात आला. या वेळी अण्णासाहेब पाटील महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, व्यवस्थापकीय संचालक मंगेश मोहिते यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मंत्री श्री. पाटील म्हणाले की, महामंडळाकडे १७ ऑक्टोबर २०२३ पर्यत व्याज परताव्यासाठी दाखल झालेली सर्व प्रकरणे निकाली काढण्यात आली आहेत. आतापर्यत ५५४ कोटी रुपयांपेक्षा अधिक व्याज परतावा मराठा समाजाकरिता देण्यात आला आहे. सद्य:स्थितीत महामंडळाकडे व्याज परताव्याचे एकही प्रकरण प्रलंबित नाही.

अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत विविध योजनांना सर्वोत्तम प्रतिसाद मिळत असून या योजनांच्या माध्यमातून राज्यभरात जवळपास ७० हजारांपेक्षा अधिक मराठा उद्योजक तयार झाले आहेत. या माध्यमातून रोजगार निर्मितीस चालना मिळत आहे.

# बेस्ट कामगारांच्या प्रलंबित प्रश्नाला आमदार प्रसाद लाड यांनी दिला न्याय

**मुंबई : प्रतिनिधी**

आपल्या मागण्या घेऊन बेस्टच्या विद्युत पुरवठा विभागातील ७२५ नैमित्तिक कामगार आझाद मैदानावर उपोषणासाठी बसले होते. त्यांच्या मागण्या जाणून घेण्यासाठी व त्यांचे उपोषण सोडविण्यासाठी श्रमिक उत्कर्ष सभेशी संलग्न असलेल्या द इलेक्ट्रिक युनियनचे अध्यक्ष व भाजप नेते आमदार प्रसाद लाड यांनी पुढाकार घेतल्याचे या वेळी दिसून आले. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी आमदार लाड यांनी उपोषणकर्त्या कामगारांच्या प्रश्नांना न्याय मिळवून दिला आहे. श्रमिक उत्कर्ष सभेच्या माध्यमातून बेस्टच्या १२३ कंत्राटी कामगारांना तात्काळ पर्मनंट करण्यात येणार असल्याचे आश्वासन महापालिका आयुक्तांनी तसेच जीएम यांनी दिले आहे. तसेच उर्वरित ६०० कामगारांना टेंपररी करण्यात येईल असे सांगितले व यापुढील काळात जागा उपलब्धतेनुसार टेंपररी कामगारांनादेखील पर्मनंट करण्यात येणार असल्याची माहिती या प्रसंगी देण्यात आली. हा कामगार एकजुटीचा विजय असल्याचे मत आमदार प्रसाद लाड यांनी या वेळी बोलताना व्यक्त केले.

उद्धव ठाकरे गटाकडे असलेल्या बेस्ट कामगार सेनेने, बेस्टच्या या नैमित्तिक कामगारांना एवढी वर्षे न्याय दिला नव्हता. श्रमिक उत्कर्ष सभेच्या माध्यमातून १६ वर्षापासून प्रलंबित असलेल्या या विषयाला सोडविण्याचा आम्ही प्रयत्न केला असल्याची भावना या वेळी आमदार लाड यांनी व्यक्त केली.

या वेळी श्रमिक उत्कर्ष सभेचे जनरल सेक्रेटरी भालचंद्र साळवी, श्रमिक उत्कर्ष सभेचे नेते संजय घाडीगावकर,रोहित केणी समीर जाधव, अशोक काळे यांच्यासह इतर उपस्थित होते.



**▌कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी पुढाकार**

*आमदार लाड यांनी श्रमिक उत्कर्ष सभा ह्या कामगार संघटनेच्या माध्यमातून नुकतीच बेस्टच्या दि इलेक्ट्रिक युनियनची धुरा हाती घेतली असून, कामगारांचे प्रश्न प्राधान्याने सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला असल्याचे या वेळी दिसून आले.*

## निवडक

### गतिरोधक, डिव्हायडरला कलर



**पनवेल :** येथील हायवे ते पनवेल रेल्वे स्टेशन रोडवरील गतिरोधकास झेब्रा लाईन आणि डिव्हायडरला कलर मारण्याची शिवसेनेने मागणी केली होती. या मागणीची महापालिकेने तत्परतेने दाखल घेत प्रत्यक्ष कामाला सुरवात केली आहे. पनवेल हायवे ते पनवेल रेल्वे स्टेशन रोड मधील रस्त्याच्या मधील डिव्हायडर ला कलर मारण्यात यावे तसेच गतिरोधकाला झेब्रा लाईन मारण्यात यावे, अशी मागणी महानगर प्रमुख माजी नगरसेवक प्रथमेश सोमण यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांच्या प्रयत्नाने प्रसिद्धी प्रमुख पनवेल शहर तोफिक अब्दुल बागवान यांनी पनवेल महापालिकेला पत्र लिहून केली होती. या मागणीची पनवेल महापालिकेने दाखल घेऊन प्रत्यक्ष कामाला सुरुवात केल्याने तोफिक अब्दुल बागवान यांनी महापालिकेचे आभार मानले.

### गावी निघालेला व्यक्ती बेपत्ता

**पनवेल :** गावी जाण्यास निघालेले ६३ वर्षीय व्यक्ती गावी पोहचले नाहीत. त्यामुळे ते हरवले असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. राम संत तिलकधारी चौहाण हे लबकणी, जिल्हा देवरिया, उत्तर प्रदेश येथून ९ ऑक्टोबर रोजी राजेश चौहाण यांच्या पाले बुद्रुक, पडघे, पनवेल येथील घरी आले होते व ते १० ऑक्टोबर रोजी सायंकाळी त्यांच्या मूळ गावी जाण्यास निघाले, मात्र ते गावी पोहचले नाहीत. राजेश यांनी नातेवाईकांकडे चौकशी केली व त्यांचा शोध घेतला. ते सापडून आले नाहीत. त्यामुळे रामसंत हे हरवले असल्याची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. त्यांच्या बाबत कोणाला माहिती असल्यास तालुका पोलिसांशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

### रोहित्रामधून तारांची चोरी

**पनवेल :** कळंबोली येथील मार्बल मार्केट परिसरातील महावितरण कंपनीच्या वीज रोहित्रामधील तांब्याच्या तारा चोरीस गेल्याची घटना घडली आहे. या तारा ७० हजार रुपये किमतीच्या होत्या. कळंबोली पोलीसांनी याप्रकरणी अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदविला आहे. कळंबोली मार्बल मार्केट येथील शिवमंदिर असून तेथे महावितरण कंपनीचे ६३० केव्ही बाय २२ केव्ही क्षमतेचे रोहित्र होते. चोरट्यांनी रोहीत्र उघडून त्यामधून तेल बाहेर काढले आणि विजेच्या तारा चोरल्या. याबाबत महावितरण कंपनीचे अधिकाऱ्यांनी कळंबोली पोलीस ठाण्यात रितसर तक्रार दिली आहे.

# 'तळाशेत येथील मंदिर परिसर पाहून मन प्रसन्न'



**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील तळाशेत-इंदापूर येथील शंकर व भवानी मंदिराचा परिसर पाहून मन अत्यंत तृप्त व प्रसन्न होतेय, असे प्रतिपादन राज्याच्या महिला व बालकल्याणमंत्री आदिती तटकरे यांनी इंदापूर येथील कार्यक्रमात बोलताना व्यक्त केले.

तळाशेत-इंदापूर येथील भवानी मंदिरामध्ये उद्यानाचा विकास करणे कामाचा भूमिपूजन सोहळा मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाला. त्या वेळी त्या जय हनुमान मंदिर इंदापूर या ठिकाणी झालेल्या कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमास राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष शेखर देशमुख, प्रदेश युवक सचिव दीपक जाधव, राष्ट्रवादीचे इंदापूर विभाग अध्यक्ष काका नवगणे, सुरेश वाघ, माणगाव पंचायत समिती माजी उपसभापती अविनाश मांडवकर, इंदापूर ग्रामपंचायतीचे सरपंच समीर मेहता, माजी उपसरपंच उदय अधिकारी, सदस्य नितीन घोणे, मेघनाथ सातपुते आदी उपस्थित होते.

मंत्री आदिती तटकरे पुढे म्हणाल्या की, इंदापूर विभागाच्या विकासासाठी खासदार सुनील तटकरेसाहेबांनी नेहमीच झुकते माप दिले. हा संपूर्ण विभाग सातत्याने तटकरे कुटुंबियांच्या पाठीशी राहिला. आपण जी जी विकासकामे सुचवाल ती आपण नक्कीच पूर्णत्वास नेऊ. महिलांसाठी कार्यशाळेचेही काम मार्गी लावू. महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना येणाऱ्या दिवाळीसाठी लागणारे साहित्य इंदापूरात बाजारपेठेत बचत गटांनी विक्रीसाठी ठेवल्यास त्यातूनही महिलांचे सक्षमीकरण होईल.

माजी उपसरपंच उदय अधिकारी म्हणाले की, तटकरे कुटुंबियांनी इंदापूर विभागाला विकासकामांच्या रूपाने भरभरून दिले आहे. आता आम्हाला भवानी मंदिराशेजारी महिलांसाठी एक कार्यशाळा हवी असल्याची मागणी त्यांनी या वेळी ना. तटकरे यांच्याकडे केली.



**नवीन पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर विचार मंचच्या वतीन भव्य नवरात्र उत्सवाचे आयोजन सिडको मैदान येथे करण्यात आले आहे. माजी नगरसेवक संतोष शेट्टी यांच्या मार्गदर्शनाखालील गरब्याच्या तिसऱ्या दिवशी चिमुकल्यांसह महिला, युवती आणि तरुणाई मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या वेळी भाविकांनी देवीचे मनोभावे दर्शन घेतले. या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली.**

# किक बॉक्सिंग स्पर्धेत 'सीकेटी'ची चमक

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

क्रीडा व युवक संचालनालय पुणे महाराष्ट्र राज्य आणि रायगड जिल्हा क्रीडा कार्यालय व पनवेल महापालिका आयोजित सेंट जोसेफ स्कूल नवीन पनवेल येथे झालेल्या जिल्हास्तरीय कीक बॉक्सिंग स्पर्धेत नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुयश संपादन केले.

यामध्ये प्रथम क्रमांक किपाश्री शेट्टी, वैदेही राडे, सोहेल सय्यद, ओम पिसाळ क्रिश माळी; द्वितीय क्रमांक जयशंकर शर्मा, श्रावणी म्हात्रे, प्रणव वाडकर यांचा आला आहे. प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागीय कीक बॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड झाली आहे.




या सर्व विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, अध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, प्राचार्य प्रशांत मोरे, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# रुग्णाचे उपचाराचे बिल केले कमी

**पनवेल : वार्ताहर**

प्राचीन हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णाचे आलेले बिल शिवसेना महानगर शिवसेना महानगर प्रमुख प्रथमेश सोमण यांच्या प्रयत्नामुळे कमी झाल्याने त्या कुटुंबीयांनी शिवसेनेसह प्रथमेश सोमण यांचे आभार मानले आहेत.

शहरातील प्राचीन हॉस्पिटलमध्ये एक मुलगा डेंगूमुळे आजारी होता त्याला ३,२४९५० बिल झाले होते. याबाबत त्यांनी पनवेल शहर समनव्यक वैद्यकीय कक्ष प्रमुख तोफिक बागवान यांना सांगितले. त्यांनतर त्यांनी तत्परतेने ही गोष्ट महानगर प्रमुख प्रथमेश सोमण यांच्या कानी घातली. त्यानुसार त्यांनी त्वरित रुग्णालयाचे विशेषकरी अधिकारी मंगेश चिवटे यांच्याशी संपर्क साधला.

या वेळी रायगड जिल्हा वैद्यकीय कक्ष प्रमुख चेतन्य पाटील, महानगर प्रमुख वैद्यकीय कक्ष प्रमुख अर्जुन परदेशी, पनवेल तालुका समनव्यक वैद्यकीय कक्ष प्रमुख अभिजित कोरपे या सर्वांच्या प्रयत्नाने व प्रथमेश सोमण यांच्या पाठपुराव्याने ४० हजार रुपयांचे बिल कमी करण्यात आले आहे. त्याबद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.

पान १ वरुन

# रायगडात भाजप महायुतीचा खासदार निवडून येईल

सनातन हिंदू संस्कृती संपविण्याची भाषा करणाऱ्यांसोबत उद्धव ठाकरे व शरद पवार यांनी युती केली आहे. हिंदू संस्कृती संपविण्याची भाषा करणाऱ्यांना आणि त्यांच्यासोबत जाणाऱ्या २८ पक्षांच्या आघाडीला येत्या लोकसभा निवडणुकीत आडवे करा, असे आवाहन भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या वेळी केले.

आत्मनिर्भर भारत बनविण्यासाठी या देशाला नरेंद्र मोदीच पंतप्रधान हवेत. मोदीजींना तिसऱ्यांदा भारताचे पंतप्रधान बनविण्यासाठी कामाला लागा. रायगड जिल्ह्यात घराघरात भाजपचा झेंडा पोहचवा, असेही प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांनी कार्यकर्त्यांना सूचित केले.

६५ वर्षे काँग्रेसने केवळ संभ्रम निर्माण करून देशात राज्य केले, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संवाद साधून देशात कायापालट केला. जनतेशी संपर्क ठेवून देश एकसंघ केला. कलम ३७० हटवले. जनसामान्यांसाठी विविध योजना राबवल्या. यापुढेदेखील नरेंद्र मोदी हेच देशाचे पंतप्रधान असले पाहिजेत. त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन भाजप दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनी केले.

मी शेकापमधून भाजपमध्ये प्रवेश केला तेव्हा माझ्या मनातदेखील शंका होत्या, परंतु पाच महिने भाजपत काम केल्यानंतर मी योग्य ठिकाणी आलो याची खात्री झाली, असे भाजप दक्षिण रायगड जिल्हा उपाध्यक्ष दिलीप भोईर म्हणाले. जिल्हा सरचिटणीस ॲड. महेश मोहिते यांनी प्रास्ताविक केले, तर संतोष पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी वरसोली येथील होरिझन हॉलमध्ये रायगड लोकसभा मतदारसंघातील विधानसभा वॉरियर्सची बैठक घेऊन त्यांना मार्गदर्शन केले. झिराड येथील तलाठी कार्यालय लोकार्पण सोहळा त्यांच्या उपस्थितीत पार पडला. अलिबाग शहरात बानकुळे यांचे भाजप कार्यकर्त्यांनी जोरदार स्वागत केले. घर घर चलो व माझी माती, माझा देश अभियानांतर्गत त्यांनी जनतेशी संपर्क साधला. त्याला अलिबागकरांनी चांगला प्रतिसाद दिला. शहरातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास तसेच सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या स्मारकास प्रदेशाध्यक्षांनी अभिवादन केले. अलिबागची कुलदैवत काळंबादेवीच्या मंदिरात जाऊन तसेच अलिशहा यांच्या दर्गात जाऊन त्यांनी दर्शन घेतले.

भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशखर बानकुळे यांच्या स्वागतासाठी संपूर्ण अलिबाग शहरात कमानी उभारण्यात आल्या होत्या. ठिकठिकाणी फलक लावण्यात आले होते. जागोजागी भाजपचे झेंडे लावण्यात आले होते. एकूणच अलिबाग शहर भाजपमय झाल्याचे दिसून आले.



# खारघर येथे जागतिक पांढरी छडी दिन

**पनवेल : प्रतिनिधी**

दिव्यांग व्यक्तींबाबत जागरुकता वाढवण्यासाठी नवी मुंबई येथे जागतिक पांढरा छडी दिन ज्ञानम गंगा चॅरिटेबल ट्रस्ट, भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सहकार्याने खारघर येथे झाला. सामान्य नागरिकांना लक्ष केंद्रित करून जनजागृती करणे आणि रस्ते वाहतूक करणाऱ्या व्यक्तींना प्रेरणा देणे दिव्यांगांना मदतीचा हात देणे. हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट असते दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी साजरा १५ छडी दिनाचे आयोजन केले जाते.

दिव्यांगांच्या अधिकारांवर प्रकाश टाकण्याचे उद्दिष्ट आहे दृष्टिहीन आणि भिन्न क्षमता असलेले लोक, स्वावलंबनाचे प्रतीक म्हणून पांढरी छडी वापरणे. तंत्रज्ञानात प्रगती असूनही, लाखो दृष्टिहीन आणि अंध व्यक्तींसाठी पांढरी छडी एक महत्त्वपूर्ण साधन आहे, ज्यामुळे त्यांना स्वतंत्रपणे आणि सुरक्षितपणे प्रवास करता येतो. ३७ वा वार्षिक जागतिक पांढरी छडी दिन नुकताच हिरानंदानी जंक्शन, खारघर येथे झाला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडचे रिफायनरीजचे संचालक संजय खन्ना, पोलीस उपआयुक्त, वाहतूक, नवी मुंबई तिरुपती काकडे, उपस्थित होते.

खारघरचे रहिवासी आणि ट्रस्टचे अध्यक्ष डॉ. राजेश शुक्ला यांनी सांगितले की, १९८६ पासून, ट्रस्ट लोकांना त्यांच्या खऱ्या क्षमतेची जाणीव करून देण्यासाठी आणि त्यांना स्वाभिमान विकसित करण्यासाठी, उच्च ध्येये निश्चित करण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करत आहे त्यांची स्वप्ने पूर्ण करण्यासाठी कठोर परिश्रम घेत आहे, २०१७ मध्ये, ज्ञानम गंगा यांनी सर्वात मोठ्या जनजागृती कार्यक्रमांपैकी एक तयार केला, सायकल टू विन ते दिल्ली ते मुंबई, ज्याने लिम्का बुक ऑफ रेकॉर्डमध्ये गौरवाचे स्थान मिळवले असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.




**जाहीर पेपर नोटीस** (प्रतिवादी क्र. २ व ३ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु.अलिबाग यांचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा कमांक/सी.सी.आर.जी.डी/९७/२०२३

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल**
पत्ता: ६२६अे/७ बी. श्रीकृष्ण निवास, रामदास मंदिराजवळ टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

विरुध्द

१) श्री. प्रविण मारुती पाटील
वदप पो- गौरकामत, ता- कर्जत
जि- रायगड, ४१०२०१.

२) सौ. सरीता सतीश भासे
वदप, घर नं - ३२८,
पो- गौरकामत, ता-कर्जत,
जि. रायगड, ४१०२०१.

३) श्री. प्रकाश बबन ठोंबरे
भिलवले, पो. चौक, ता - खालापुर,
जि. रायगड. ४१०२०३. } प्रतिवादी

**दावा रूपये ६५.०८६/-**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २१/११/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १७/१०/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड- रत्नागिरी, सहकार भवन (रा. जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या अलिबाग कॅपस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी,अलिबाग,एस.टी.स्टँड समोर, मु.पो.ता. अलिबाग जि.रायगड - ४०२२०१

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय,**
**मु. अलिबाग रायगड व रत्नागिरी जिल्हा**

# पनवेलमधील झोपडपट्टीधारकांचे लवकरात लवकर पुनर्वसन करा

## ॲड. मनोज भुजबळ यांची मागणी



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रांमधील सिडको हद्दीतील पंचशिलनगर, रेल्वे व सिडको हद्दीतील मालधक्का तसेच शिवाजीनगर, लोकमान्य नगर, नवनाथनगर, व इंदिरानगर यांचे लवकरात लवकर पुनर्वसन नैना अथवा सिडको हद्दीत टी. पी. एस. १ मध्ये उभारलेल्या बालाजी सिंफोनी या इमारतीमधील अंदाजे २००० हजार सदनिकांमध्ये करण्याची मागणी माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ यांनी पनवेल महापालिकेचे आयुक्त गणेश देशमुख यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

पनवेल महापालिकेमध्ये व प्रभाग १७ मधील नविन पनवेलमधील पंचशिलनगर, तसेच पश्चिमेकडील मालधक्का ह्या वसाहती सिडको व रेल्वेच्या जागेत वर्षानुवर्षापासून वसलेल्या आहेत. सदर वसाहतीमधील घरे अथवा झोपडयांचा पनवेल महापालिकेमार्फत सर्वे होवून व्ही. पी. नंबरसुध्दा दिलेले आहेत. वरील विषयांकित झोपडया म्हणजेच पंचशिलनगर, मालधक्का, शिवाजीनगर, इंदिरानगर व + नवनाथनगर यांना पनवेल महानगरपालिकेतर्फे त्यांना घरपट्टया न मिळाल्यामुळे नळ अथवा पाणी कनेक्शन सुध्दा दिले जात नाही, थोडक्यात पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या हरघर जल या व्याखा हरताळ फासला जातो की काय याची शंका उपस्थित होते.

झोपडीधारक हेसुध्दा झोपडपट्टीमध्ये राहण्यास उत्सुक नाहीत. त्यांनाही चांगले घर मिळावे व कुटुंबासह चांगल्या जागेत रहावयास जाण्याची त्यांची सुध्दा इच्छा आहे. आपल्या पनवेल महानगरपालिकेच्या हद्दीलगत आकुर्ली-सुकापूर येथे मागील ४/५ वर्षांपासून ओ. सी. घेवून तेथील जवळ जवळ २००० सदनिका / घरे ही एमएमआरडीए यांच्या ताब्यात घेण्याच्या प्रतिक्षेत आहेत, परंतु अद्याप ताब्यात घेतल्या नाहीत.

यावरून एमएमआरडीएला सदरच्या घरांची आवश्यकता नाही असे दिसून येते. सुकापूर-आकुर्ली येथील नैना हद्दीमधील मे. बालाजी सिंफोनी यांच्याकडून मिळणारी २००० घरे आपल्या महानगरपालिकेने ताब्यात घेवून पनवेल रेल्वे स्थानकाच्या पुर्व व पश्चिम बाजूकडील ट्रॅफिकची सोय, पार्किंगची सोय करून वरील झोपडपट्टीधारकांना सदर सदनिकांचे वाटप करावे जेणेकरुन नविन पनवेल पूर्व व पनवेल पश्चिम मधील सर्वसामान्य रहिवाशांना ट्रॅफिक, पार्किंग व रहदारीपासून सुटका मिळेल व झोपडपट्टी पुनर्वसन हा हेतू सुध्दा सफल होईल.

### ...अन्यथा तीव्र आंदोलन!

लवकरात लवकर वरील पंचशिलनगर, मालधक्का यांचे तसेच शिवाजीनगर, नवनाथनगर, इंदिरानगर व लोकमान्यनगर यांचे पुनर्वसन करुन सर्व झोपडपट्टीधारक व नवीन पनवेल, पनवेलमधील रहिवाशांना ट्रॅफिकपासून, पार्किंगपासून दिलासा मिळून स्वच्छ व सुंदर शहर म्हणून पनवेलची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रात होईल आणि आपल्याकडून हे सुध्दा शक्य होत नसेल तर मला एक माजी लोकप्रतिनिधी म्हणून तीव्र आंदोलन छेडावे लागेल याचीही नोंद घ्यावी, असे या निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या निवेदनाची प्रत आमदार प्रशांत ठाकूर आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनाही देण्यात आली आहे.

## महापालिका जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धा

# रामशेठ ठाकूर विद्यालयाची चमकदार कामगिरी



**खारघर : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवकसेवा संचलनालय अंतर्गत रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी अलिबाग व पनवेल महापालिका यांच्या वतीने १६ व १७ ऑक्टोबर २०२३ रोजी शालेय जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धांचे आयोजन नवी मुंबई पोलीस मुख्यालय, रोडपाली येथे करण्यात आले होते. या स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर ओवेपेठ येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेऊन उज्वल यश संपादन केले.

या स्पर्धा १४, १७ व १९ वर्षांखालील मुले व मुली यांच्या वयोगटात घेण्यात आल्या. यामध्ये खारघर येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालायातील विद्यार्थ्यांनी दमदार कामगिरी करीत घवघवीत सुयश संपादन केले.

१७ वर्ष मुले करण यतवाडकर (अकरावी) याने भाला फेकमध्ये प्रथम, १९ वर्ष मुले ऋषी पाटील याने ११० हर्डलमध्ये प्रथम तर १९ वर्ष मुलींमध्ये प्रिती गुप्ता (इ. ९ वी) हिने तिहेरी उडीमध्ये प्रथम, क्रमांक मिळविला. १४ वर्ष मुले साहिद खान (इ. ८ वी) याने उंच उडी, व ८० मी. हर्डल मध्ये तृतीय, १४ वर्ष मुलींमध्ये रजमिन शेख हिने उंच उडी व ८० मी. हर्डल मध्ये व्दितीय, १७ वर्ष मुलींमध्ये प्रिती गुप्ता (इ. ९ वी) हिने उंच उडी व १०० मी. हर्डल मध्ये व्दितीय, वंशिका पारवे (इ. १० वी) हिने १०० मी. हर्डल मध्ये तृतीय, १७ वर्ष मुले अबुबकर मोडक याने तिहेरी उडीमध्ये तृतीय, आर्यन पावसे (इ. ११ वी) याने ५००० मी. चालणे मध्ये तृतीय, मयुरेश चौधरी (इ. १० वी) याने ४०० मी. हर्डलमध्ये तृतीय, विघ्नेश वासकर (इ. ९ वी) याने १०० मी. हर्डल व उंच उडी मध्ये तृतीय, युवराज मढवी (इ. ११ वी) याने हाथोडा फेक मध्ये तृतीय, सिदधेश घरत (इ.१२ वी) याने उंच उडी व ११० मी. हर्डल मध्ये तृतीय, क्रमांक पटकविला.

या स्पर्धेमध्ये रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक तीन, व्दितीय क्रमांक चार व तृतीय क्रमांक अकरा अशी एकूण अठरा पदके जिंकली आहेत. यापैकी प्रथम व द्वितीय क्रमांक मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांची मुंबई विभागिय मैदानी स्पर्धे साठी निवड करण्यात आली आहे. त्यांना क्रीडा शिक्षक संभाजी जाधव, प्रविण पाटील, यांचे उत्कृष्ट मार्गदर्शन लाभले.

संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, महापालिका माजी सभागृह नेते परेश ठाकूर, संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय. टी.देशमुख, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य संजय भगत, सचिव डॉ. एस. टी. गडदे, उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या निशा नायर, शाळा व्यवस्थापन समिती सदस्य प्रभाकर जोशी व माध्यमिक विद्यालयाचे प्रभारी मुख्याध्यापक संतोष खांदेकर, सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी वृंद व सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या क्रीडा शिक्षकांचे अभिनंदन करुन पुढील मुंबई विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.





**पनवेल : जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली संकुलात दांडिया रास कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले. विद्यालयातील पूर्वप्राथमिक विभाग इंग्रजी माध्यमात दांडिया रास कार्यक्रम अतिशय उत्साहात साजरा करण्यात आला.**

(छाया : प्रफुल्ल कांबळे)





**पनवेल : डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी उपजिल्हा रुग्णालयाच्या शवागराची महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी पाहणी करून स्वच्छतेबाबतच्या सूचना दिल्या आहेत. या रुग्णालय शवागरातील दर्पामुळे परिसरातील नागरिक हैराण झाले आहेत. रुग्णालयातील शवपेटींची संख्या सहा आणि १० मृतदेह तसेच शवागरात बंद असलेल्या वातानुकुलित यंत्रणेचे हवा थंड करणारे यंत्र बंद असल्याने अनेक समस्या उद्‌भवत आहेत. या पार्श्वभूमीवर माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी मंगळवारी उपजिल्हा रुग्णालयाला भेट देत समस्यांचा आढावा घेतला तसेच स्वच्छतेबाबतच्या सूचना दिल्या. या वेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल शहराध्यक्ष अनिल भगत, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी उपस्थित होते.**

# बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांची खांदेश्वर पोलीस ठाण्यात भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागूबाई चांगु ठाकूर (बीसीटी) विधी विद्यालय लॉ कॉलेज यांच्या वतीने विद्यार्थ्यांना पोलिसी कामकाजाचा मार्गदर्शन व्हावे यासाठी खान्देश्वर पोलीस ठाणे येथे भेट या कार्यक्रमाचा आयोजन करण्यात आले होते. या वेळी बीएलएस थर्ड इयरचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



खांदेश्वर पोलीस ठाण्यामध्ये हा कार्यक्रम झाला या कार्यक्रमासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक लांडगे सर स्वतः जातीने उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मौल्यवान अशी माहिती दिली, त्याचबरोबर हवालदार, पोलीस, महिला निरीक्षक यांनीदेखील विद्यार्थ्यांना चांगले मार्गदर्शन केले.

पोलीस ठाण्यामध्ये होणाऱ्या कामकाजाबद्दल त्यांनी माहिती दिली. पोलीस ठाण्यामधील विभागांमध्ये कोणत्या प्रकारचे काम कशाप्रकारे केले जाते याबद्दल सविस्तर माहिती विद्यार्थ्यांना यावेळेस देण्यात आली. त्याचबरोबर अपराध्यांबरोबर कशी वागणूक दिलेली दिली जाते, एखाद्या अपराधासाठी न्यायालयात कशी दाद मागितले जाते या संदर्भातदेखील तेथील हवालदार यांनी मुलांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचा आयोजन आहे असिस्टंट प्रोफेसर क्रांती मॅडम सागर सर यांनी केलेले होते. त्याचबरोबर कार्यक्रमाच्या सांगतेसाठी तेथे उपस्थित पोलीस, महिला पोलीस यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांना सन्मानित करून कर्मचाऱ्यांचे आभार व्यक्त केले.

# सेंट जोसेफ स्कूलमध्ये पोस्टर स्पर्धा

## पनवेल मनपाच्या पर्यावरण विभागाचा उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माझी वसुंधरा अभियान ४.० अंतर्गत महापालिका कार्यक्षेत्रात विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. बुधवारी (दि. १८) नवीन पनवेल येथील सेंट जोसेफ स्कूल मध्ये माझी वसुंधरा ४.० अंतर्गत पर्यावरणपूरक सण साजरे करण्याच्या पार्श्वभूमीवरती पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. महापालिकेच्या वतीने पर्यावरणाबद्दल विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती होण्याच्यादृष्टीने विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते.

याचाच एक भाग म्हणून उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या सूचनेप्रमाणे पर्यावरणपूरक सणांचे महत्व विद्यार्थ्यांना समजावे यादृष्टीकोनातून नवीन पनवेलमधील सेंट जोसेफ स्कूलमध्ये फटाके बंदी व पर्यावरणपूरक दिवाळी ह्या विषयावरती पोस्टर मेकिंग स्पर्धा घेण्यात आली. इयत्ता पाचवी ते सातवी आणि आठवी ते १० अशा दोन गटात झालेल्या यास्पर्धेत सुमारे २०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विजेत्या विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. यानंतर पालिका क्षेत्रातील आणखीन चार शाळेमध्ये पर्यावरणविषयक स्पर्धा घेण्यात येणार आहे. यास्पर्धेसाठी पर्यावरण विभाग प्रमुख मनोज चव्हाण, विद्यालयाचे मुख्याध्यापक फरझाना तुंगेकर आणि चित्रकला विषयाचे शिक्षक  सचिन काटकर यांचे सहकार्य लाभले.




## दुर्गामाता दौड (माळ चौथी)





**पनवेल : नवरात्रोत्सवानिमित्त श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थान पनवेल विभागाच्या वतीने आयोजित दुर्गामाता दौड या धार्मिक उपक्रमाची चौथी माळ खांदा कॉलनी परिसरात गुंफण्यात आली. या दौडला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी भाजप युवा मोर्चा खांदा कॉलनी अध्यक्ष अभिषेक भोपी यांच्या प्रमुख उपस्थितीत युवकांसोबतच नागरिक, महिला, लहान मुले दौडमध्ये सहभागी झाल्याचे पहावयास मिळाले.**









**पनवेल : आदिशक्तीचा उत्सव सर्वत्र मोठ्या उत्साहात सुरू असून अनेक मंडळाच्या वतीने नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शिवाजीनगर, उलवे, करंजाडे, नवीन पनवेल, भंगारपाडा या ठिकाणी आयोजित नवरात्रोत्सवांना भेट देत देवीचे दर्शन घेतले. या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, भाऊ भोईर, माजी नगरसेवक ॲड. मनोज भुजबळ, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष सुभाष भुजबळ, करंजाडे ग्रामपंचायतीचे सरपंच मंगेश शेलार, विभागीय अध्यक्ष कर्णा शेलार, समीर कटेकर आदी उपस्थित होते.**


## संपादकीय

# व्यापक चर्चा आवश्यक

समलिंगी संबंध ही केवळ शहरी अभिजनांमधील संकल्पना आहे याबद्दल घटनापीठाने असहमती दर्शवली असली तरी आजच्या घडीला तरी बहुसंख्य भारतीयांना हा प्रश्न अतिशय गुंतागुंतीचा वाटतो. घटनापीठातील पाच न्यायाधीशांनी यासंदर्भात चार वेगवेगळी निकालपत्रे दिली यावरून या विषयासंदर्भातील विभिन्न बाबींविषयी समाजातही केवढी मतभिन्नता असावी याचा प्रत्यय येतो.

**विशेष विवाह कायद्यांतर्गत समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता दिली जाऊ शकत नाही असा निकाल सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दिला. यासंबंधी कायदा करण्याचा अधिकार संसदेचा आहे असे सर्वोच्च न्यायालयाच्या पाच सदस्यांच्या घटनापीठाने आपल्या निकालात स्पष्ट केले. समलिंगी विवाहाशी संबंधित अन्य मुद्यांवर घटनापीठाच्या न्यायाधीशांनी भिन्न-भिन्न निर्णय दिले, परंतु अशा विवाहांना कायदेशीर मान्यता देण्याच्या मुख्य मुद्यावर मात्र सर्व न्यायाधीशांमध्ये एकमत होते. समलिंगी व्यक्तींच्या विवाहांना कायदेशीर मान्यता मिळावी आणि त्यासाठी १९५४च्या विशेष विवाह कायद्यात दुरुस्ती केली जावी अशी याचिकाकर्त्यांची प्रमुख मागणी होती, मात्र सध्याच्या कायद्यांनुसार समलिंगी जोडप्यांना विवाह करण्याचा किंवा सहवासाचा (सिव्हिल युनियन किंवा सिव्हिल पार्टनरशिप) अधिकार नाही असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. काही वर्षांपूर्वी समलिंगी संबंधांना न्यायालयाच्याच एका निर्णयाने गुन्हेगारी कक्षेतून वगळण्यात आले. तेव्हापासून समलिंगी विवाहाच्या कायदेशीर मान्यतेची मागणी होऊ लागली. या संदर्भात वेगवेगळ्या न्यायालयांमध्ये याचिका दाखल झाल्या होत्या. त्या सर्व याचिका एकत्र करून सर्वोच्च न्यायालयाने स्वत:कडे सुनावणीसाठी घेतल्या. केंद्र सरकारला आपले म्हणणे मांडण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिल्यानंतर केंद्र सरकारने प्रतिज्ञापत्राच्या माध्यमातून न्यायालयात म्हणणे मांडले. समलिंगी विवाहांना कायदेशीर मान्यता देण्याला केंद्र सरकारने विरोध दर्शविला होता. आपली भूमिका भारतीय समाजरचनेत मान्यता मिळालेल्या विवाह संस्कृतीला व संयुक्त कुटुंब पद्धतीला अनुसरून असल्याचे केंद्र सरकारचे म्हणणे होते. पती, पत्नी, मुले आणि घरातील ज्येष्ठ मंडळींचा समावेश असलेल्या संयुक्त कुटुंब संकल्पनेशी समलिंगी संबंध विपरीत असल्याचे मत या प्रतिज्ञापत्रात व्यक्त करण्यात आले. या कुटुंब पद्धतीसाठी दोन भिन्नलिंगी व्यक्तींमधील विवाह आवश्यक आहे. भारतामधील विवाहाची सामाजिक, सांस्कृतिक व कायदेशीर संकल्पना हीच आहे. ती विस्कळीत होता कामा नये असे मत केंद्र सरकारने आपल्या प्रतिज्ञापत्रात व्यक्त केले होते. समलिंगी विवाहाला मान्यता दिल्यास वैयक्तिक कायदे आणि सामाजिक नियम यांच्यातील संतुलन बिघडेल अशी भीतीही केंद्राने व्यक्त केली होती, जी रास्तच वाटते, मात्र समलैंगिकांना विवाहाचा अधिकार देता येईल किंवा काय याचा विचार करून निर्णय घेण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याचा प्रस्ताव केंद्र सरकारने या घटनापीठासमोर ठेवला होता. अशी समिती नेमली जावी अशी अपेक्षा घटनापीठाने आपल्या निकालपत्रात व्यक्त केली आहे. ही समलिंगी व्यक्तींसाठी समाधानाची बाब म्हणावी लागेल. न्यायालयाला बहुसंख्य लोकांच्या भावना व भूमिका यांची दखल घ्यावी लागेल असे ठाम प्रतिपादन सरकारच्या वतीने करण्यात आले, जे अतिशय योग्यच होते. शहरी भागांतून काही अल्प प्रमाणात आज समलिंगी जोडपी एकत्र राहताना दिसतात. त्यांना एकत्रित मालमत्ता खरेदी करता येत नाही, पती-पत्नीप्रमाणे बँकेत एकत्रित खाते उघडता येत नाही. काही जणांची मूल दत्तक घेण्याचीही इच्छा दिसते, परंतु हे सारेच प्रश्न सर्वार्थाने अतिशय गुंतागुंतीचे असल्याने त्यावर व्यापक चर्चा होण्याची गरज आहे.**

# पारसोंड येथील रामवरदायिनी मातेची अख्यायिका

**खबरबात**
**शैलेश पालकर**

समर्थ रामदास स्वामींनी जगन्मातेचे वर्णन, तुळजापुरी ठाकेना। चालली पश्चिमेकडे। पारघाटी जगन्माता। सद्य येऊनि राहिली।। असे केलेले आढळते. तेच सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वरपासून रस्त्याने २० किमी आणि प्रतापगडापासून तीन किमी अंतरावर रस्त्यालगतच्या फाट्यापासून चार किमी अंतरावर वसलेले श्रीक्षेत्र पार्वतीपूर म्हणजेच पारसोंड येथील श्रीरामवरदायिनी मंदिर असल्याचे सांगितले जात आहे. येथे नवरात्रोत्सवानिमित्त असंख्य भाविकांची रेलचेल सुरू झाली आहे. दूर्गाष्टमीनिमित्त येथे श्रीपितांबरी चक्रपूजा, श्रीपितांबरी याग, विशेष आरती, गोंधळ आणि महाप्रसादाचे आयोजन दरवर्षी करण्यात येते.

हिंदवी स्वराज्यावर अफजलखानाचे दृष्टचक्र आले आणि त्याने वाटेत येताना तुळजापूरचे भवानी मंदिर फोडून टाकले, मात्र ही बाब आधीच जाणलेल्या समर्थ रामदासांनी तुळजापूरहून देवीची मूर्ती शोधून पारघाटी आणली. ती मूर्ती पारसोंड येथून चार किमी अंतरावरील मेट या दूर्गम जंगलाच्या ठिकाणी ठेवली. याबाबत, रामवरदायिनी माता। दास धुंडूनी आणली। ओळखी पाडिता ठायी। भिन्न भेद असेचिना।। असा उल्लेख समर्थ वाङ्मयामध्ये आढळून येतो. आंतरनिष्ठ अखंड ध्यानी। संन्निध रामवरदायिनी। विश्वमाता त्रयलोक्यजननी। मूळमाया।। या वाक्याचा संदर्भ प्रचलित आणि कुंभे शिवथर, कसबे शिवथर आणि आंबेशिवथर या तीन गावांच्या परिसरातील सर्वश्रुत शिवथरघळीबाबतच्या संशोधनातील त्या शिवथरघळीच्या वरच्या बाजूस चंद्रराव मोरे यांचा वाडा असावा आणि चंद्रराव मोरे यांची कुलस्वामिनी श्रीरामवरदायिनी असल्याने तिथे तिचे स्थान असावे, असे व्यक्त करण्यात आलेले त्या शिवथरघळीचे संशोधक शंकर श्रीकृष्ण देव यांचे अंदाज अद्याप सिध्द झाले नसून ते कधीही सिध्द होऊ शकणार नाहीत, असा दावा रामदासपठार येथील समर्थ रामदासस्वामी यांच्या सुंदरमठ आणि आनंदवनभुवनचे अभ्यासक शैलेश पालकर यांनी केला आहे. या विषयावर संशोधन मांडताना समर्थांच्या याच वाक्याचा नीट अभ्यास करून समर्थ रामदासपठार येथील सुंदरमठामध्ये ध्यानस्थ बसले तर दक्षिणाभिमुख स्थितीत समोरच्या पर्वतरांगांच्या पलिकडे किमान आठ ते १० डोंगरांपलिकडे सातारा जिल्ह्यातील श्रीक्षेत्र पार्वतीपूर म्हणजेच पारसोंड म्हणजेच पार येथील श्रीरामवरदायिनी मंदिर हेच समर्थांना संन्निध दिसत असावे, असा दावा केला आहे. यासाठी गुगल अर्थ या सॉफ्टवेअरद्वारे उपग्रह छायाचित्रदेखील प्राप्त केले असून पालकर यांच्या म्हणण्यानुसार यामुळे या दाव्याला पुष्टी मिळते. या एका शोधामुळे समर्थांचे सुंदरमठ, आनंदवनभुवन आणि शिवथर घळ ही समर्थकृत सर्वग्रंथ लेखन, पहिला गणेशोत्सव, पहिली शिवसमर्थ भेट यांचे ठिकाण रामदासपठार येथे आहे ही पहिली खात्री होते, तर समर्थांनी या वाक्यात नमूद केलेली रामवरदायिनी म्हणजे पार येथील मंदिरच आहे ही दुसरी खात्री पटते, असाही पालकरांचा दावा आहे. या वाक्यातील 'संन्निध रामवरदायिनी।' या उल्लेखासोबत 'विश्वमाता त्रयलोक्यजननी। मूळमाया।।' असा ही मूर्ती समर्थांनी तुळजापूर येथून आणली असल्याने केला आहे, असा तिसरा निष्कर्ष आहे. 'सुंदरमूर्ती सुंदरगुण। सुंदर किर्ती सुंदर लक्षण। सुंदरमठी देवे आपण। वास केला।।१२।। गिरीकंदरी सुंदरवने। सुंदर वाहाती जीवने।त्यामध्ये सुंदर भुवने।रघुनाथाची।।१३।। सुंदर पाहोन वास केला। दास संन्निध ठेविला। अवघा प्रांतचि पावन केला। कृपाळूपणे।।१४।।' या श्रीदासायनातील उल्लेखात पुढे 'अंतरनिष्ठ अखंड ध्यानी। सन्निध रामवरदायिनी। विश्वमाता त्रयलोक्य जननी। मूळमाया।।१४।।' या उल्लेखानुसार समर्थांना ध्यानस्थ बसल्यावर सातारा जिल्ह्यातील पारसोंड येथील श्रीरामवरदायिनी सन्निध दिसत असावी असा अंदाज आहे.


हिंदवी स्वराज्यावर अफजलखानाचे दृष्टचक्र आले आणि त्याने वाटेतील अनेक हिंदूंची तिर्थस्थाने उद्ध्वस्त केली. यामध्ये वाटेत तुळजापूरचे भवानी मंदिर असल्याने तेदेखील फोडून टाकले जाईल, अशी जाणीव समर्थांना झाली. म्हणून त्यांनी तेथे दुसरीच पाषाणाची मूर्ती बनवून बसविली आणि मूळमायेची अष्टभूजामूर्ती झोळीमध्ये घेऊन पारसोंडपासून जवळच्याच मेट येथील डोंगरात जंगलामध्ये ठेवली. हे श्रीरामवरदायिनीचे मूळस्थान आहे. समर्थांनी भवानीमातेची अष्टभूजामूर्ती बदलून तेथे ठेवलेली दुसरी पाषाणाची मूर्ती अफझलखान तुळजापूरमध्ये गेल्यानंतर फोडली. समर्थांनी बदललेल्या या भग्नमूर्तीला सध्याच्या तुळजाभवानीच्या मंदिराच्या प्रवेशद्वाराजवळील झाडाच्या चौथऱ्यामध्ये पुरून ठेवण्यात आले आहे, अशी माहिती तेथे गेले असता जुन्या पुजाऱ्यांकडून प्राप्त झाल्याचा दावा आहे.

एकूण अफजलखानाच्या भोरप्याच्या डोंगरापर्यंतच्या वाटचालीचा कार्यकाळ पाहता तुळजापूर येथे त्यावेळी भवानीमातेची अष्टभूजामूर्ती नव्हती. समर्थांनी ती पारजवळील मेट येथे आणली होती. तर जेथे शिवरायांनी अफजलखानाचा कोथळा काढला. तेथे भोरप्याच्या डोंगर होता पण प्रतापगड अस्तित्वात नव्हता म्हणजेच तेथे प्रतापगडावरील भवानीमातेचे मंदिरही अस्तित्वात नव्हते. खानाचा कोथळा काढल्यानंतर त्यांच्याकडील सर्व संपत्ती हिंदवी स्वराज्याच्या तिजोरीमध्ये जमा केली गेली आणि या संपत्तीतूनच शिवरायांनी खानाला ठार मारून केलेल्या प्रतापाची आठवण म्हणून भोरप्याच्या डोंगराचे प्रतापगड किल्ल्यात रूपांतर करून तेथे भवानीमातेचे मंदिर बांधण्यात आले. अफजलखानाच्या वधानंतर १६५६ साली या कामास सुरूवात होऊन १६५८ साली प्रतापगड उभारण्यात आला. राजमाता जिजाऊंच्या आग्रहानुसार तसेच समर्थांच्या श्रीगणपतीच्या नवसानुसार छत्रपती शिवाजी महाराजांवरील आणि हिंदवी स्वराज्यावरील हे संकट टळल्यानंतर आसाम राज्यातील गंडकी नदीतील पाषाणापासून भवानीमातेच्या दोन मुर्ती घडविण्यात आल्या. यापैकी एक प्रतापगडावरील भवानी मंदिरामध्ये तर दुसरी तुळजापूर येथे स्थानापन्न करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांना भवानी मातेने तलवार दिल्याचा जो प्रसंग सांगितला जातो. तो या परिस्थितीत पार येथेच भवानीमातेची अष्टभूजामूर्ती समर्थांनी आणल्याने झालेला दृष्टांत असण्याबाबत काळाच्या ओघात स्पष्ट दिसून येते. कारण तुळजापूरलाही मंदिरामध्ये भवानीमातेची मूर्ती नव्हती आणि प्रतापगड अस्तित्वातच नव्हता म्हणून तेथील भवानीमंदिरही अस्तित्वात असण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे शिवरायांना झालेल्या भवानीमातेच्या दृष्टांताचा संदर्भ समर्थांनी तुळजापूर येथून पार येथे आणलेल्या जगन्माता भवानीमातेच्या अष्टभूजामूर्तीशी जवळीक साधणारा आहे.

पोलादपूर येथे मठ व समाधी असलेले कवींद्र परमानंद यांच्या शिवभारतात तुळजापूरच्या भवानीमातेचा उल्लेख असून त्यात खानाने देवीचा अवमान केल्याचा निर्देशही आहे. दुसऱ्या निर्देशात कवींद्र परमानंदांनी, 'इदा निमन्पी दैत्यरे। विमुच्या तुळजापूरम्। उदेता स्मिता जानी ही। सहाय्या येवं ते स्वयंम्। यथा जाते नं कंसेन। यथा हमवसा निता। पूर्व तथा धुनै ते नाप्याव। ज्ञातास्मी पाप्यमा।।' असे म्हणजेच देवीने शिवरायांना दर्शन देऊन सांगितले की, सध्या मी तुझ्या सहाय्यासाठी तुळजापूर सोडून जवळ आले आहे असे समज, पूर्वी जसा मूर्ख कंसाने तसा (सध्या या पाप्याने) माझा अवमान केला आहे. यावरूनच तुळजाभवानी मातेच्या कृपेनेच अफजलखानाचा वध करून महाराजांची किर्ती आसमंतात उजळून निघाली. चारी यवनी शाह्यांना धास्ती बसली. यातील 'इदा निमन्पी दैत्यरे। विमुच्या तुळजापूरम्।' या वाक्याचा अर्थही समर्थांच्या 'तुळजापूरी ठाकेना। चालली पश्चिमेकडे।' या वाक्याशी सुसंगत असल्याने शिवरायांना झालेल्या भवानीमातेच्या दृष्टांताचा संदर्भ 'पारघाटी जगन्माता। सद्य येऊनि राहिली।।' असे जगन्मातेचे सद्यस्थान दाखवून देत आहे.




## अकाउंट सुरक्षित ठेवण्यासाठी व्हॉट्सअॅपचे पास-की फिचर





व्हॉट्सअॅप हे एक सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आहे. व्हॉट्सअॅपने आपल्या वापरकर्त्यांसाठी एक नवीन फीचर लॉन्च केले आहे. आपल्या वापरकर्त्यांना हे प्लॅटफॉर्म वापरताना अधिक सुरक्षा प्राप्त व्हावी म्हणून कंपनीने पास-की फिचर लॉन्च केले आहे. कंपनीने एक्सवर पोस्ट करत याबद्दल माहिती दिली. व्हॉट्सअॅप आपल्या वापरकर्त्यांसाठी अनेक नवनवीन फीचर्स लॉन्च करते असते, जेणेकरून वापरकर्त्यांना व्हॉट्सअॅप वापरताना अधिक चांगला अनुभव मिळेल. व्हॉट्सअॅपचे हे नवीन सेफ्टी फीचर्स वापरकर्त्यांना त्यांचे अकाउंट सुरक्षित ठेवण्यासाठी अधिक मदत करणार आहे.

व्हॉट्सअॅपचे पास-की हे फिचर एक प्रकारचे सेफ्टी फिचर आहे, जे तुमचे अकाउंट अधिक सुरक्षित ठेवण्यास मदत करते. यामध्ये नवीन डिव्हाइस तुमच्या अकाउंटमध्ये लॉग इन करताना तुम्हाला पास-कीची आवश्यकता भासते, ज्यामुळे तुमच्या अकाऊंटची गोपनीयता आणि सुरक्षितता वाढते. या फीचरचा वापर करणे खूप सोपे आहे. सर्वांत पहिल्यांदा तुम्ही तुमचे व्हॉट्सअॅप उघडावे. त्यानंतर सेटिंग्जवर जावे आणि अकाउंट निवडावे. पास की लॉग इन पर्याय निवडून सेटअप करावा. त्यानंतर पास-की फिचर तयार केले जाऊ शकते हेदेखील पाहूयात. सध्या हे फिचर काही अँड्रॉइड वापरकर्त्यांसाठी रोलआऊट करण्यात आले आहे. काही कालावधीनंतर हे सर्वांसाठी लॉन्च करण्यात येणार आहे.

पास-की हे फिचर तयार करण्यासाठी सर्वांत पहिल्यांदा तुमचा मोबाइल नंबर टाकावा. त्यानंतर आठ आकडी पास- की टाकावा, जे तुम्ही लक्षात ठेवू शकता. त्यानंतर पुन्हा एकदा ते आकडे पाठवून पुष्टी करावी. या फीचरमुळे तुमच्या व्हॉट्सअॅप अकाऊंटची सुरक्षितता वाढते. पास-की शिवाय तुमच्या अकाउंटमध्ये कोणी प्रवेश करू शकत नाही. यामुळे तुमची गोपनीयता आणि डेटा नेहमीच सुरक्षित राहतो. व्हॉट्सअॅपचे पास-की फिचर तुमचे अकाउंट अधिक सुरक्षित करते. हे फिचर सेटअप करून तुम्ही तुमचे व्हॉट्सअॅप अकाउंट सुरक्षित ठेवू शकता. त्याच वेळी पास-कीच्या माध्यमातून तुम्ही फेस, फिंगरप्रिंट, पिनद्वारे, व्हॉट्सअॅपवर लॉग इन करू शकता.

# स्वाध्याय परिवाराचे प्रणेते पांडुरंगशास्त्री आठवले



**निमित्त**

आध्यात्मिक गुरू पांडुरंगशास्त्री आठवले पांडुरंगशास्त्री आठवले अर्थात दादा हे मराठी तत्त्वज्ञ होते. ते स्वाध्याय परिवाराचे प्रणेते, संस्थापक होते. त्यांना रेमन मॅगसेसे, टेंम्पलटेंट पुरस्कार, महात्मा गांधी पुरस्कार, लोकमान्य टिळक पुरस्कार, पद्मविभूषण, अशा विविध पुरस्कारांनी गौरवण्यात आले. त्यांचा जन्मदिवस स्वाध्याय परिवार जगभर मनुष्य गौरव दिन म्हणून साजरा करतात.

पांडुरंगशास्त्री आठवले यांचा जन्म १९ ऑक्टोबर १९२० रोजी रोहे या कोकणातील गावी झाला. पारंपरिक शिक्षणाबरोबर सरस्वती संस्कृत पाठशाळेत संस्कृत व्याकरणाबरोबर न्याय, वेदांत, साहित्य, त्याचबरोबर इंग्लिश भाषा साहित्याचा अभ्यास पांडुरंगशास्त्री यांनी केला. त्यांना रॉयल एशियाटिक सोसायटी मुंबई या संस्थेने सन्माननीय सदस्यत्व देऊन सन्मानित केले होते. या ग्रंथालयात त्यांनी कादंबरी विभाग सोडून सर्व मानव्य शाखेतील प्रमुख लेखकांचे, ग्रंथाचे अध्ययन केले. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे यावर चिंतन केले.

मुंबईतील माधवबाग येथील श्रीमद्गवगीता पाठशाळेत पांडुरंगशास्त्री यांनी संस्थेच्या व्यासपीठावरून नियमितपणे न चुकता वैदिकांच्या तेजस्वी जीवनवादाचा पुरस्कार केला. पांडुरंगशास्त्री आठवले यांचा विवाह १९४४ साली रत्नागिरी जिल्ह्यातील गावखडी येथील निर्मलाताई सिधये यांच्याशी झाला. निर्मलाताईंनी स्वाध्याय परिवाराच्या रचनात्मक कार्यातही दादांना भक्कम साथ दिली. स्वाध्याय कार्यातील बंधू-भगिनींना तसेच तत्त्वज्ञान विद्यापीठातील विद्यार्थ्यांना त्यांचे मोलाचे मार्गदर्शन कायम लाभत होते.

१९५४मध्ये जपान येथे झालेल्या दुसऱ्या धार्मिक परिषदेत पांडुरंगशास्त्री वेद आणि भगवद्गीतेवरील तत्त्वज्ञानावर भाषण केले. त्यानंतर त्यांना परदेशात स्थायिक होण्याच्या अनेक संधी आल्या, पण त्यांनी त्या नम्रपणे नाकारल्या. वास्तव जीवन आणि भगवद्गीतेची शिकवण यांची सांगड घालण्यासाठी तत्त्वज्ञान विद्यापीठाची कल्पना त्यांच्या मनात आली. तरुणांनी भगवद्गीतेची तत्वे वास्तविक जीवनात आचरणात आणावीत म्हणून त्यांनी या विद्यापीठात दोन अभ्यासक्रम सुरू केले.

दादांच्या देहावसनानंतर ताई ठाणे येथील तत्त्वज्ञान विद्यापीठात वास्तव्याला होत्या. ३ ऑगस्ट १९२६ रोजी जन्मलेल्या निर्मलाताई आठवले यांचे वयाच्या ९०व्या वर्षी ३१ जानेवारी २०१७ रोजी निधन झाले. स्वाध्याय चळवळ ही श्रीमद्भगवगीतेवर आधारित आत्मज्ञानाची चळवळ आहे. ही चळवळ भारतातील लाखो गावांपर्यंत पसरली. त्यांनी गीता आणि उपनिषदांवर आपले प्रवचन दिले जे खूप प्रसिद्ध होते. त्यामुळे त्यांची आजही आठवण येते. त्यांनी लोकांचे लक्ष आध्यात्मिक समाजाकडे वेधले.

स्वाध्याय परिवाराची स्थापना करून पांडुरंगशास्त्री यांचा जन्मदिवस दरवर्षी मनुष्य गौरव दिन म्हणून साजरा केला जातो. त्यांनी साहित्य, वेदांत आणि न्याय यांचा अभ्यास केला. असे म्हटले जाते की पांडुरंग शास्त्रींनी अखंड वैदिक धर्म, जीवनपद्धती, उपासना करण्याचा मार्ग आणि पवित्र व्यासपीठावरून लोकांना विचार करण्याची पद्धत दिली. ज्याच्या आधारावर स्वाध्याय परिवाराची स्थापना झाली. इ.स. १९९२मध्ये त्यांना टिळक पुरस्कार मिळाला. तो पुरस्कार देताना तेव्हाचे राज्यपाल म्हणाले होते, विद्वत्ता आणि दैवी शक्तीचा संगम झाल्यावरच समाजाचे आणि देशाचे हित सुरक्षित राहते. पांडुरंगशास्त्री आठवले यांची शिकवण सर्व समाजाने आचरण्यात आणण्याची गरज आहे.

१९९१मध्ये श्याम बेनेगल यांनी आठवले यांच्या स्वाध्याय चळवळी किंवा प्रयोगांवर आधारित अंतरनाद (द इनर व्हॉईस) हा चित्रपट तयार आणि दिग्दर्शित केला, ज्यात शबाना आझमी आणि कुलभूषण खरबंदा यांच्या प्रमुख भूमिका होत्या. २००४मध्ये अबीर बजाझ यांनी आठवले यांच्या जीवनावर आणि कार्यांवर आधारित स्वाध्याय या लघुपटाचे दिग्दर्शन केले.

**(साभार : मराठी वेबदुनिया)**

**क्लिक...क्लिक...!**



**उरण : नवरात्रोत्सवानिमित्त जसखार येथील रत्नेश्वरी देवीच्या मंदिरात दर्शनासाठी भाविक येत आहेत.** (छाया : तन्वी पवार)

## आरोग्य प्रहर

### पाठदुखीचा त्रास असेल, तर वाचा हा उपाय...



पाठीची दुखणी आजकाल प्रत्येक वयात होऊ लागली आहेत. विद्यार्थ्यांपासून ते कर्मचारीवर्गापर्यंत अनेकांची जीवनशैली बैठी असल्याने सांधेदुखी ही कॉमन समस्या झाली आहे. डॉ. सिद्धार्थ शाह यांनी पाठीच्या दुखण्यावरील एका उपायाविषयी माहिती दिली आहे.

रोज ३० मिनिटे जमिनीवर मांडी घालून बसल्याने पाठ, नितंब व पायांचे स्नायू ताणले जातात. यामुळे सांध्यांची लवचिकता सुधारण्यास मदत होते. हे मणक्याची नैसर्गिक वक्रता कायम ठेवण्यास मदत करते. याशिवाय चालतानासुद्धा तुमचे संतुलन सुधारण्यास मदत होऊ शकते. ही मुद्रा तुमच्या पायाच्या व पाठीच्या स्नायूंमध्ये रक्त प्रवाह वाढवते आणि रक्ताभिसरणालासुद्धा चालना देते. या संदर्भात अजून वैज्ञानिक अभ्यास व पुरावे समोर येणे गरजेचे आहे.

मांडी घालून बसल्याने पाठीचे, नितंब आणि पायांचे स्नायू हळूवारपणे ताणले जातात, लवचिकता सुधारते. त्यामुळे, तुमच्या दैनंदिन हालचाली सुलभ होतात आणि स्नायूंवर येणारा ताण आणि दुखापतीचा धोका कमी होतो.

मांडी घालून बसताना तुम्हाला फक्त पाठीचा कणा जास्त वाकवायचा नाहीये. यामुळे, पाठ आणि मानेचे दुखणे कमी होऊ शकते आणि एकूणच शरीराला आराम मिळू शकतो.

मांडी घालून बसल्याने पोट व शरीराचा कोअर म्हणजेच पोटाच्या स्नायूंची शक्ती वाढते.

काही पुरावे असे सूचित करतात की मांडी घालून बसणे रक्त प्रवाह सुलभ करू शकते आणि रक्ताभिसरण सुधारू शकते

मांडी घालून बसल्याने ताण-तणाव कमी होत असल्याचे म्हटले जाते यामुळे आपोआपच शरीराला आराम करत असल्याचा भास होतो.

एकाग्रता आसन एकाग्रता आणि सतर्कता वाढवू शकते, ज्यामुळे मानसिक क्षमता वाढून त्याची गरज असलेल्या कामामध्ये मदत होते.

काहीही करण्यापूर्वी तुमच्या शारीरिक क्षमतेचे मूल्यांकन करा. स्नायूंवर येणारा ताण किंवा त्यामुळे होणाऱ्या दुखापतीचा धोका टाळण्यासाठी बसताना व उठताना काळजी घ्या व वेगाने पायाला झटका देऊ नका.

# धनगर समाजालाही आरक्षण मिळावे

## आमदार गोपीचंद पडळकर यांची आग्रही मागणी



**रोहे : प्रतिनिधी**

धनगर समाजालाही आरक्षण मिळावे, अशी आग्रही मागणी आमदार गोपीचंद पडळकर यांनी धनगर जागर यात्रा निमित्ताने धाटाव येथे सकल धनगर समाज रायगड आयोजित कार्यक्रमात मार्गदर्शन करताना केली.

धनगर समाजाला आरक्षणापासून प्रस्तापितांनी दुर ठेवले आहे. धनगर समाजामध्ये जनजागृती करण्यासाठी धनगर जागर यात्रा काढण्यात आली. २० जिल्ह्यात २१ सभा घेत पहिला टप्पा आज पूर्ण होत आहे. आमचा अखेरचा लढा धनगर आरक्षणाचा आहे. धनगर आरक्षणाची लढाई आम्ही जिंकणारच आहोत, असे सांगत ३३ आदिवासी जातींना दाखले मिळविण्यासाठी मी प्रयत्न करणार असून पुढची लढाई यासाठीच करणार असल्याचे पडळकर यांनी सांगितले.

यावेळी धाऊ ढेबे, नरेश कोकरे, धर्माजी हिरवे, वकील आखाडे, चंद्रकांत शिंगाडे, रवी झोरे, रामभाऊ केण्डे, बावदने, रामभाऊ केंडे, लक्ष्मण शिंगाडे, अनंत गोरे, अमित घाग, तानाजी देशमुख, बबलू सय्यद आदी उपस्थित होते.

प्रास्ताविकात नरेश कोकरे यांनी आरक्षणासाठी आपण लढा देत असल्याने सर्व समाज ताकतीने आपल्यामागे उभा राहणार आहे. आज तरुण रायगड जिल्ह्यातील तुमच्या पाठीशी आहे. रायगडात दुर्लक्षीत आमचा धनगर समाज आहे, असे सांगितले.

# खोपोलीत भटक्या कुत्र्यांची दहशत



**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली शहरात मोकाट कुत्र्यांमुळ संपूर्ण शहर प्रचंड हैराण झाले आहे. शहरात मोकाट कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. यातील काही कुत्री पिसाळली असल्याने त्यांच्याकडून शाळकरी विद्यार्थी, महिला व नागरिकांवर अचानक हल्ला करून जखमी करण्यात येत आहे.

दुसरीकडे नगरपालिका रुग्णालयात रेबीज वरील उपचारासाठीचे इंजेक्शन व औषधी उपलब्ध होत नसल्याने बाधित नागरिकांना नाईलाजाने खासगी रुग्णालयात उपचार करावे लागत आहेत. संपूर्ण शहरात मोकाट व पिसाळलेल्या कुत्र्यांची दहशत असून हातात काठी घेऊन नागरिकांना फिरावे लागण्याची अनोखी स्थिती खोपोलीत निर्माण झाली आहे.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलानी मौजे हरिग्राम ता. पनवेल , जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**: जमिनीचे वर्णन :**

**मोजे – हरिग्राम, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर. पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| हरिग्राम | शशिकांत दत्ताराम जाधव<br>शरद दत्ताराम जाधव | १९ | १ | ५–२५–५०० | २१.५२ |

**सरद जमिन मिळकतीपैकी रोडलगतची पुर्वेकडील ०.१६.०० गुंठे जमिन मिळकत**

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणा–या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

**ता. पनवेल**
**दिनांक : १७/१०/२०२३**

सही/–
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि. रायगड मोबाईल. ९३२४३७५५०२


# कार अपघातात एक जण गंभीर

**पेण : प्रतिनिधी**

पेणमधील गणपतीवाडी येथील भोगावती पुलावरून कार खाली कोसळून एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली आहे.

याबाबत माहिती अशी मंगळवारी रात्री १२च्या सुमारास (एमएच ०६ बीएम ४४४७)ही कार गणपतीवाडी जवळील भोगावती पुलावरून जात असताना कार चालकाचे नियंत्रण सुटून हि कार पुलावरून २० फूट खाली कोसळली. या वेळी कारमध्ये चालकासोबत दोन व्यक्ती होते. गाडी एका झाडाला अडकल्यानेमी मोठी दुर्घटना टळली. या अपघातात एक जण गंभीर जखमी झाला असून दोन जण सुखरूप आहेत.

घटनेची माहिती मिळताच पेण पोलीस ठाण्याचे पोलीस, पेण नगरपरिषदेचे अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी पोहचून त्यांनी जखमीला तातडीने दवाखान्यात हलविले व दोन जणांना सुखरूप बाहेर काढले. या वेळी ग्रामस्थांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती. या घटनेचा अधिक तपास पेण पोलीस करीत आहेत.


## जाहीर पेपर नोटीस

(प्रतिवादी क्र. १ करीता)

**मा. न्यायाधिश, सहकारी न्यायालय, रायगड, रत्नागिरी, मु.अलिबाग यांचे न्यायालयात (रायगड, रत्नागिरी जिल्हा)**

मुकादमा कमांक/सी.सी.आर.जी.डी/९६/२०२३

**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल**
पत्ता: ६२६अे/७ बी. श्रीकृष्ण निवास, रामदास मंदिराजवळ
टिळक रोड, पनवेल, रायगड ४१० २०६. } वादी

विरुध्द

१) श्री. बळीराम पंढरीनाथ घोडविंदे
किकवी घर नं – ४१५. पो. पाथरज.
ता– कर्जत. जि–रायगड, ४१०२०१.

२) श्री. नवीन वसंत देशमुख
देशमुख निवास, चिन्मय नगर,
मोगलवाडी पो. खोपोली,
ता. खालापुर, जि. रायगड ४१०२०३

३) श्री. सुरज बाळासाहेब चौगुले
भानवज, वर्धमान विहार, बिडिंग ने ५ अे.
रूम नं–३, पो–खोपोली, ता. खालापुर,
जि.रायगड– ४१०२०३. } प्रतिवादी

**दावा रूपये ६८.४४६/–**

ज्या अर्थी उपनिर्दिष्ट वादी यांनी दावा या न्यायालयात दाखल केला आहे. त्या अर्थी आपण आपली बाजू मांडण्यासाठी दि. २१/११/२०२३ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता स्वतः जातीने सदर दाव्याबाबतीतील कागद पत्रासह हजर रहावे.

या नोटीशीअन्वये आपणास असे कळविण्यांत येते की, वर नमूद केलेल्या दिवशी व वेळी आपण हजर रहाण्यास कसूर केल्यास आपल्या अनुपस्थितीत दाव्याची सुनावणी केली जाऊन त्याचा निर्णय केला जाईल.

त्याचप्रमाणे अशीही नोटीस देण्यात येते की, वर नमुद केलेल्या तारखेस अगर तत्पूर्वी सदर दाव्यातील हुकमाची बजावणी करण्यासाठी आपला संपूर्ण पत्ता दाखल करण्यांत कसूर केल्यास आपला बचाव रद्द समजण्यात येईल.

आज दि. १७/१०/२०२३ रोजी माझी सही व न्यायालयाची मुद्रा यासह दिले.

कोर्टाचा पत्ता : सहकार न्यायालय रायगड– रत्नागिरी, सहकार भवन (रा. जि.प्रा. शिक्षक सह. पतसंस्था मर्या अलिबाग कॅपस) दुसरा मजला, ब्राह्मण आळी,अलिबाग,एस.टी.स्टँड समोर, मु.पो.ता. अलिबाग जि.रायगड – ४०२२०१

कोर्टाचा शिक्का

सही/–
**ज्युडिशियल क्लार्क**
**रायगड जिल्हा सहकारी न्यायालय,**
**मु. अलिबाग रायगड व रत्नागिरी जिल्हा**



# पनवेल महानगरपालिका

## ता. पनवेल, जि. रायगड

## जाहिर सूचना

**महापालिकेच्या विविध विभागांच्या कार्यालयीन कामकाजाकरीता, अभिलेख ठेवण्याकरीता तसेच वैद्यकीय आरोग्य विभागास शहर आरोग्यवर्धिनी उपकेंद्र व औषध भांडारासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन घेणेबाबत.**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात नागरी प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यान्वित करणे तसेच कार्यालयीन कामकाजाकरीता तळमजला अथवा तळमजला + पहिला मजला वरील जागा भाडेतत्वावर घेणेकामी मा. आयुक्त, पनवेल महानगरपालिका इच्छुक व्यक्ती / संस्था यांचेकडून अर्ज मागविणेत येत आहेत.

सदरच्या जागा / इमारती या बांधकाम पूर्ण असलेल्या वाहनतळ व शौचालय या सुविधांयुक्त असाव्यात. जागा / इमारत भाडेतत्वावर घेणेचा कालावधी ११ महिन्याचा असेल.

| अ.क्र. | नोड | विभाग | वापर | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ (१) | आवश्यक जागेचे क्षेत्रफळ (२) |
|---|---|---|---|---|---|
| १) | नवीन पनवेल | मालमत्ता कर विभाग | कार्यालयीन कामकाज | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| २) | खारघर | मालमत्ता कर विभाग | कार्यालयीन कामकाज | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ३) | कामोठे | मालमत्ता कर विभाग | कार्यालयीन कामकाज | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ४) | तळोजे | मालमत्ता कर विभाग | कार्यालयीन कामकाज | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ५) | पनवेल | पाणीकर विभाग | कार्यालयीन कामकाज | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ६) | पनवेल | लेखा विभाग | अभिलेख | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ७) | पनवेल | वैद्यकीय आरोग्य विभाग | शहर आरोग्य वर्धिनी उपकेंद्र (UHWC) | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |
| ८) | जुईगाव कामोठे मोठा खांदा | वैद्यकीय आरोग्य विभाग | शहर आरोग्य वर्धिनी उपकेंद्र (UHWC) | १५०० ते २००० चौ. फूट | २००० ते ४००० चौ. फूट |

**इच्छुक व्यक्ती/संस्था यांनी जागेचे ठिकाण, क्षेत्रफळ, भाडे इ. तपशीलासह अर्ज पनवेल महानगरपालिकेच्या** panvelcorporation@gmail.com **या मेलआयडी वर दिनांक २५/१०/२०२३ रोजी सायं. ५.०० वा. पर्यंत जमा करावेत.**

**जा.क्र. पमपा/माव्य/३५२३/प्र.क्र.०७/३९३/२०२३**
**दिनांक :– १८/१०/२०२३**

सही/–
**उपआयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**



**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था पनवेल तालुका यांचे समोर**
**सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार,**
**ए विंग, पहिला मजला, सहकार नगर पनवेल, ता पनवेल, जि रायगड ४१०२०६**

**महाराष्ट्र सहकारी अधिनियम १९६० चे कलम १०१ खाली दावा नोटीस**

पनवेल पिपल्स नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित नविन पनवेल ता पनवेल जि रायगड शाखा नविन पनवेल या संस्थेने या कार्यालयाकडे महाराष्ट्र सहकारी कायदा अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये खालील व्यक्तीं विरूध्द थकीत कर्जाचा भरणा केला नसल्याचे नमुद करून वसुली प्रमाण मिळणेसाठी अर्ज केलेला आहे.

त्यानुसार या कार्यालयात वेळोवेळी सुनावणी ठेवण्यात आली, तथापी खालील नमुद व्यक्तींना सुनावणी नोटिसची पोहोच होत नसल्याने नैसर्गिक न्याय तत्वानुसार म्हणने दाखल करण्यासाठी जाहिर नोटिस व्दारे आपणास पुन्हा एक संधी देण्यात येत असुन सदर दाव्या बावत अंतीम सुनावणी . ०६/११/२०२३ रोजी सकाळी ११.३० वाजता ठेवण्यात आली असुन सदर सुनावणीस आपण स्वतः वा आपले प्रतिनीधी मार्फत उपस्थीत राहावे आपण गैरहजर राहिल्यास आपल्या अनुपस्थीतीत दाव्याचा निकाल केला जाईल व नंतर आपले कोणतेही म्हणने ऐकुण घेतले जाणार नाही.

| अ.क्र | दावा क्रमांक | कर्जदार / सहकर्जदार | पत्ता | थकीत कर्ज |
|---|---|---|---|---|
| १) | २१/ २०२३– २०२४ | १) श्री शत्रुघ्न छोटेलाल वैश्य (कर्जदार)<br>२) श्री शंकर गंगाराम धोत्रे (जामिनदार)<br>३) श्री गिरीष चंद्रकांत जगे (जामिनदार) | मु.धोंडु परदेशी बिल्डींग, रूम नं. ३, भिंगारी, पनवेल ४१०२०६<br>मु. संगीता अपार्टमेन्ट रूम ४०३, देवद, पनवेल ४१०२०६<br>मु. अनुकूल रेसिडेन्सी, रूम ३०४ उसाली खुर्द, पनवेल ४१०२२१ | ३३,२७६/ |
| २) | २२/ २०२३– २०२४ | १) श्री साईनाथ गणपत माळी (कर्जदार)<br>२) श्री काळूराम कृष्णा माळी (जामिनदार)<br>३) श्री दशरथ धनाजी पाटिल ( जामिनदार) | मु दुंदरे गाव घर नं १३२ पो. मोरवे ता पनवेल ४१०२०६<br>मु. दुंदरे गाव, गोपाळ कृष्ण मंदिर जवळ, पो. मोरवे ता पनवेल ४१०२०६<br>मु. दुंदरे गाव दुर्गा माता मंदिर जवळ, पो. मोरबे ता पनवेल ४१०२०६ | ६२,६९७/– |
| ३) | २३/ २०२३ – २०२४ | १) श्री जयेश जयदास ढवळे (कर्जदार)<br>२) श्री अनिकेत अनंता भगत (जामिनदार)<br>३) श्री आनंद कुंडलिक शिंदे (जामिनदार) | मु.शिवकर घर नं१३, पो चिखले ता पनवेल ४१०२०६<br>मु. घर नं १६४९ भगत आळी तक्का ता पनवेल ४१०२०६<br>मु. अमर निवास, प्लॉट नं २९, सेक्टर नं १०, खांदा कॉलनी ता पनवेल ४९०२०६ | ३४,४४१/– |
| ४) | २४ / २०२३– २०२४ | १) श्री गिरीष चंद्रकांत जगे (कर्जदार)<br>२) श्री शत्रुघ्न छोटेलाल वैश्य ( जामिनदार)<br>३) श्री शंकर गंगाराम धोत्रे (जामिनदार) | मु. अनुकूल रेसिडेन्सी रूम ३०४ उसाल खुर्द, पनवेल ४१०२२१<br>मु. धोंडु परदेशी बिल्डींग रूम नं. ३, भिंगारी, पनवेल ४१०२०६<br>मु. संगीता अपार्टमेन्ट रूम नं. ४०३, देवद, पनवेल ४१०२०६ | ३४,४०७/– |
| ५) | २५/ २०२३ – २०२४ | १) बी समाधान बळीराम गायकर (कर्जदार)<br>२) श्रीमती फरजाना हमीद शेख (जामिनदार)<br>३) श्री सतिश श्रीपती महिंद (जामिनदार) | मु. केवाळे, पोस्ट मोरबे, ता पनवेल, जि रायगड ४१०२०६<br>मु. शेख बिल्डींग मोठा खांदा ता पनवेल जि रायगड ४१०२०६<br>मु. साई प्रसाद इन्क्लीव प्लॉट न. २७, सेक्टर नं ७, कामोठे ता पनवेल, जि रायगड ४१०२०६ | ३३,९८०/– |
| ६) | २७/ २०२३– २०२४ | (१) श्री रमेश रावसाहेव कुमकर (कर्जदार )<br>२) श्री विनोद सहदेव उशीरकर (जामिनदार)<br>३) श्री सचिन दशरथ सरडे (जामिनदार) | मु. विश्वराज प्राईड सोसायटी फ्लॅट नं ४०२, उसाल खुर्द, ता पनवेल जि रायगड ४१०२२१<br>मु. साई शरण सोसायटी, फ्लॅट नं ३०६, उसाल खुर्द, ता पनवेल जि रायगड ४१०२२१<br>मु. लक्ष्मी निवास, हाऊस नं २८३ / १, शिलोत्तर रायचूर, सुकापूर ता पनवेल जि रायगड ४१०२०६ | १,०१,२१६/– |
| ७) | २९/ २०२३– २०२४ | १) श्री सागर गणपत भोईर (कर्जदार)<br>२) श्री उमेश तुकाराम लहाने (जामिनदार)<br>३) श्रीमती मैथिली निलेश म्हात्रे (जामिनदार) | मु. हरिगाम घर नं ७२, राम मंदिर जवळ पो मोरबे, ता पनवेल जि. रायगड ४१०२०६<br>मु. भिंगारवाडी, पो अजिवली ता पनवेल, जि रायगड ४१०२०६<br>मु. रूम नं ३०२, महालक्ष्मी नगर विहिघर, पो. नेरे ता पनवेल ४१०२०६ | ४०,९०३/– |

सदरची नोटीस माझे सही शिक्यानिशी दिली आहे.
स्थळ :– पनवेल
दिनांक :– १७/१०/२०२३
जावक क्रमांक :– २२३८/२०२३–२४
संस्था, पनवेल

शिक्का

सही/–
**सहाय्यक निबंधक**
**सहकारी संस्था, पनवेल जि रायगड**



## जाहिरात

कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन या संस्थेची रुग्णवाहिका क्र ३७६६ जशी आहे तशी व जेथे आहे तेथे या तत्वावर विकणे आहे. त्यासठी मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत तरी इच्छूकांनी ही जाहिरात प्रसिध्द झाल्यापासून एक आठवड्याच्या आत आपली निविदा प्रमुख कार्यवाह, कुष्ठरोग निवारण समिती, शांतिवन, पो. नेरे, ता. पनवेल, जि. रायगड या पत्त्यावर कार्यालयीन वेळेत ( सकाळी ९ ते १२.३० व दुपारी १.३० ते ५.३०) पाठवावी. निविदा पाठवतांना अे–४ साईजच्या प्लेन पेपरवर स्वच्छ अक्षरात अथवा टाईप करुन पाठवावी. ज्यांना रुग्णवाहिका पहायची असेल त्यांना ती संस्थेच्या मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा म्हणजे रुग्णवाहिका आपल्याला दाखविण्याची व्यवस्था करता येईल.

दिनांक १६/१०/२०२३

शिक्का

सही/–
**प्रमुख कार्यवाह**
**कुष्ठरोग निवारण समिती**
**दूरध्वनी : (०२१४३) २९८१२६**



# उरण नगरपरिषद, उरण

## जाहिर निविदा सुचना–२०२३

मा.मुख्याधिकारी,उरण नगरपरिषद,उरण.यांजकडुन खालील कामासाठी इच्छुक ठेकेदार/पुरवठादार कडुन दोन लिफाफा पध्दतीने सिलबंध दरपत्रक मागविणेत येत आहे.

**विषय–** उरण नगरपरिषदेच्या विमला तलाव येथे गणेश विसर्जन करिता HDPE फ्लोटींग जेटी १२.२५ स्वेअर मिटर खरेदी करणेकामी ठेकेदार नियुक्ती करणे बाबत.

**इसारा रक्कम** ५०००/–रुपये **निविदा फॉर्म फी.**/–३००० /– रुपये. **कामाचा कालावधी–** १५ दिवस
**निविदा सादर करणेची मुदत–** दिनांक १९/१०/२०२३ ते २७/१०/२०२३ पर्यंत.
**निविदा उघडणेचा दिनांक–** ३१/१०/२०२३ रोजी अथवा नगरपरिषदेच्या प्रशासकीय सोईनुसार.
**आवश्यक कागदपत्र –**१) आयकर विवरणपत्र. २) अनुभवाचे दाखला, ३) नोंदणी प्रमाणपत्र ४) जी. एसटी, प्रमाणपत्र, पॅनकार्ड ५) फॉर्म फी भरल्याची पावती ६) इसारा रक्कम भरल्याची पावती.

**सुचना– १)** सदर निविदेबाबत तपशिलवार माहिती नगरपरिषदेच्या भांडार विभागात मिळेल.

**जा.क्र.उनप/भांडार/१८३७/२०२३–२०२४**
**उरण नगरपरिषद,**
**उरण, दिनांक : १८/१०/२०२३**

सही/–
**(श्री.राहुल इंगळे)**
**मुख्याधिकारी,**
**उरण नगरपरिषद**



# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ७४/२०२३-२०२४ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील ९५० मि.मी. व्यासाच्या व ६७५ मि.मी. व्यासाच्या भूमिगत जलवाहिन्यांवर विविध ठिकाणी एमजी एफई बाय-मेटल जंक्शनचा पुरवठा करून बसविणे व चाचणी घेऊन कार्यान्वित करणे. | ₹ २,३६,७७,५००.०० |
| २. | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्र पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती.. पाताळगंगा येथील विअर मधील गेट्सचे वार्षिक तत्वावर परिचालन व देखभाल करणे. | ₹ १५,७६,५३९.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १९/१०/२०२३ ते दिनांक ०२/११/२०२३ पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक २३/१०/२०२३ पूर्वी त्यांचे प्रश्न महामंडळाच्या संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक २६/१०/२०२३ पासून महामंडळाच्या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# ‘मातोश्री’वर असते किचन कॅबिनेट

## भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**नवी मुंबई : बातमीदार**

आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी व राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली काम करतोय. त्याच शिदोरीवर आम्ही लोकांपर्यंत जातोय. घरी बसून आम्ही करत नसून ‘मातोश्री’वर किचन कॅबिनेट असल्याचा टोला त्यांनी लगावला भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे हे नवी मुंबईत जनसंवाद कार्यक्रमानिमित्त ते आले होते त्यावेळी ते बोलत होते.

उद्धव ठाकरेंकडे किंचित सेनेचे सरसेनापती.. त्यांच्या कार्यकारणीत विदर्भात, मराठवाड्यात ना उत्तर महाराष्ट्रातील कार्यकर्त्यांना प्राधान्य दिलं नाही. जे निष्ठावंत शिलेदार निघून गेलेत.. लोकंच उरली नाहीत तर पद कोणाला देतील ? असा खोचक प्रश्न त्यांनी केला. या वेळी ते म्हणाले की, पुढील दोन महिन्यात आम्ही साडेतीन लाख घरी पोहचणार असून आगामी लोकसभा निवडणुकीत ४५ पेक्षा अधिक जागा आम्ही निवडून आणू असा विश्वास भाजप प्रदेश अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला.



या वेळी आमदार गणेश नाईक, भाजप नवी मुंबई अध्यक्ष संदीप नाईक, आमदार रमेश पाटील तसेच पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते. वाशीतील कार्यक्रमांना बेलापूरच्या आमदार मंदा म्हात्रे, या उपस्थित होत्या.

भाजपचे सध्या जनसंवाद अभियान सुरू असून ऐरोली विधानसभेत अभियान राबवले गेले. यात सुरवातीला भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला भेट, दुचाकी फेरी, एक सभा आणि वारीयर्स मार्गदर्शनपर सभा असा भरगच्च कार्यक्रम आयोजित केला होता. या वेळी पत्रकारांशी त्यांनी संवाद साधला. नवी मुंबई मेट्रो बाबत छेडले असता आपल्यासर्वांना आंनद असला पाहिजे. केंद्रात मोदींनी आणि राज्यात देवेंद्रनी जी कामे केलीत त्यामुळे ही उदघाटन होत आहेत. नऊ वर्षांत जी विकासकामे केलीत त्यावर भाजप मजल मारेल असे ते म्हणाले.

### ‘नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधान होतील’

देशातील १४० कोटी जनतेला नरेंद्र मोदी हेच पुन्हा पंतप्रधानपदी हवे असून तेच २०२४ मध्ये पंतप्रधान पदाची तिसऱ्यांदा पुन्हा शपथ घेतील असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांचा महाराष्ट्रातील सर्व लोकसभा मतदार संघात प्रवास सुरू आहे. त्यातील एक भाग असलेल्या ठाणे लोकसभा मतदार संघातील ऐरोली आणि बेलापूर विधानसभा मतदार संघाचा कार्यक्रम संकल्प दौरा झाला.

### नवी मुंबईत विविध कार्यक्रम

बावनकुळे यांनी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनावर आधारित चित्र प्रदर्शन, ग्रंथालय आणि ध्यानधारणा केंद्राला भेट दिली. विविध जाती धर्मातील नागरिकांनी खेळाडूंनी या ठिकाणी बावनकुळे यांचे स्वागत केले. लोककल्याणकारी मोदी सरकारच्या माध्यमातून मागील नऊ वर्षात देशाची झालेली प्रगती याविषयीची माहिती देणारीचित्रफीत या ठिकाणी प्रदर्शित करण्यात आली. त्यांच्या हस्ते दिव्यांग बांधवांचा सत्कार देखील करण्यात आला. वाशीतील मराठा भवन येथून घर घर संपर्क रॅली काढण्यात आली.

# तुर्भेकरांना पुरेसे पाणी देण्याची मागणी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या मोर्चे धरणात समाधानकारक पाऊस पडला. धरण ओसंडून वाहन असले तरी शहरात. कमालीचा पाणीटंचाई निर्माण झाली आहे. तुर्भे परिसरात तर रात्री दोन वाजता पाणीपुरवठा होत आल्याने कष्टकरी श्रमिकांना पिण्याच्या पाण्यासाठी जागरण करावे लागत आहे. याबाबत माजी नगरसेवक सुरेश कुळकर्णी यांनी नवी मुंबई मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांची प्रत्यक्ष भेट घेऊन तुर्भे परिसरातील नागरिकांना पुरेसे पाणी मिळावी, अशी मागणी केली आहे.

तुर्भे विभागातील तुर्भे स्टोअर इंदिरा नगर गणपती पाडा, आंबेडकर नगर गणेश नगर व हनुमान नगर या प्रभागातील ४८, ६८,६९ ,७०,७१ आणि ७३ या सहा प्रभागा मधील पिण्याचा पाण्याची समस्या अत्यंत बिकट झाली आहे. नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा व्हावा यासाठी गेल्या ५ वर्षापासुन तुर्भे येथील माजी नगरसेवक सुरेश कुलकर्णी यांनी महापालिकेकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे. तरी सुद्धा पाणी प्रश्न सुटलेलं नाही. या विभागाला ठाणे एमआयडीसी तर्फे पाणी पुरवठा केला जातो. त्यापोटी एमआयडीसीला नवी मुंबई पालिका महिना २ कोटी रुपये अदा करते, मात्र एमआयडीसीकडून येथील नागरिकांना रात्री एक तर कधी दोन वाजल्या नंतर पाणी येते तेही कमी दाबाने पाणी येत असल्याने दिवसभर काबाडकष्ट करणार्या कष्टकरी मजूरवर्ग यांना पाण्यासाठी जागरण करण्याची वेळ आली आहे.

तुर्भे परिसरात राहणारा गोरगरीब नागरिक महापालिकेला कर भरतो आहे. जनतेची तहान भागवण्याचा महापालिकेचे कर्तव्य असताना महापालिके मुळे नागरिकांना पाणी टंचाईला सामोरे जावे लागते. याबाबत नवी मुंबई महापालिका प्रशासनाने त्वरित पावले उचलत पाणी समस्या मार्गी लावावी, अशी मागणी सुरेश कुलकर्णी यांनी केली आहे.

> **तुर्भे परिसरात ठाणे एमआयडीसीतर्फे पाणी पुरवठा केला जातो. एमआयडीसी तर्फे पालिकेला आडीज एमएलडी कोटा असताना फक्त दीड एमएलडी पाणी पुरवठा होत असल्याने तुर्भे विभागाला समस्या येत आहे, परंतु महापालिकेचे एमआयडीसीच्या अधिकार्यां सोबत चर्चा सुरू असून लवकरच मार्ग निघून तुर्भे परिसरातील नागरिकांना पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होईल.**
> **–संजय देसाई, मुख्य शहर अभियंता, नवी मुंबई मनपा**

## निवडक



### सुधागड विद्या संकुलला पाण्याचे यंत्र भेट

**कळंबोली :** आयसीआयसी लोबार्ड हेल्थ पॉलिशी व सेवा सहयोग फाउंडेशन ठाणे यांच्या वतीने सुधागड विद्या संकुल कळंबोली येथील पूर्व प्राथमिक हिंदी माध्यम विभागातील विद्यार्थ्यी व शिक्षकांसाठी केंट या कंपणीचे पाणी शुध्दीकरण यंत्र भेट देण्यात आले. या पाणी शुध्दीकरण यंत्राचे उद्धाघट घटस्थापणेच्या दिवशी सुधागड विद्या संकल कळंबोलीचे प्राचार्य राजेंद्र पालवे यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी उपमुख्याध्यापक सुरेश मोरे, हिंदी पूर्व प्राथमिकचे शिक्षक दिनेश पाटील व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. पाणी शुध्दीकरण यंत्र मिळावे. यासाठी प्राचार्य राजेंद्र पालवे व प्राथमिक विभागाच्यानिवृत्त मुख्याध्यापिका जयवंती सावंत यांनी प्रयत्न केले होते.

### गुटखा, पान, तंबाखूचा साठा हस्तगत

**पनवेल :** गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलने खिडूकपाडा गावाच्या हद्दीतील स्टील मार्केटकडे जाणाऱ्या रस्त्यावर एक गाडी अडवून त्यामध्ये असलेला मोठ्या प्रमाणात गुटखा पान मसाला व सुगंधित तंबाखूचा साठा हस्तगत केला आहे. गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलचे वपोनी उमेश गवळी यांना खास बातमीदाराकडून खिडूकपाडा गावाच्या हद्दीत गुटख्याचा साठा घेऊन गाडी वाहतूक करीत असल्याची माहिती मिळाली त्यानुसार सापळा रचून एका व्यक्तीस गाडीसह थांबविले असता त्याच्या ताब्यात मोठ्या प्रमाणात गुटखा पान मसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आला. त्यामुळे त्याच्या विरोधात आरोग्यास अपायकारक असा महाराष्ट्रात विक्री, साठवणूक व वाहतुकीस प्रतिबंधित असलेला अन्नपदार्थ बेकायदेशीररित्या व मानवी शरिरास घातक व लोकजिवीतास धोका निर्माण करणाऱ्या प्रतिबंधित अन्न पदार्थाचा विक्री करण्याच्या उद्देशाने वाहतूक करीत असताना मिळून आल्याने त्याच्या विरुद्ध कारवाई करण्यात आली आहे.

# कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिकेचे प्रकाशन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग, नवी मुंबई यांनी तयार केलेल्या अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिकेचे प्रकाशन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या महासंचालक जयश्री भोज यांच्या हस्ते बुधवारी (दि. १८) मंत्रालयात करण्यात आले.



राज्यातील वत्तपत्रे, वृत्तसंस्था, इलेक्टॉनिक प्रसारमाध्यांमध्ये वृत्तविषयक काम करणाऱ्या पत्रकार प्रतिनिधींना अधिस्वीकृती पत्रिका देण्यात येते. यासाठी शासनाव्दारे विभाग आणि राज्यस्तरीय समित्यांची स्थापना करण्यात आली आहे. या प्रक्रीयेची परिपूर्ण आणि विहित माहिती नसल्यामुळे पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिकेसाठी अर्ज करताना अडचणी येतात. अपूर्ण भरलेले अर्ज आणि त्रुटींमुळे हे अर्ज नामंजूर होतात. यामुळे पत्रकारांना अधिस्वीकृती पत्रिकेपासून वंचित राहावे लागते. असे होऊ नये या करिता ही अधिस्वीकृती संदर्भ पुस्तिका तयार करण्यात आली आहे. या पुस्तिकेत पत्रकारांना देण्यात येणाऱ्या अधिस्वीकृती पत्रिकेबाबतच्या शासन निर्णयांची सोप्या शब्दांत माहिती देण्यात आली आहे. सविस्तर शासन निर्णय/नियमावली पाहण्याकरिता पुस्तिकेत दिलेल्या बारकोडवर स्कॅन करून www.dgipr.maharashtra.gov.in या संकेत स्थळाला भेट देता येऊ शकते.

या छोटेखानी कार्यक्रमास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक (माहिती व प्रशासन) हेमराज बागुल, संचालक (माहिती, वृत्त व जनसंपर्क) राहुल तिडके, उपसंचालक (वृत्त) दयानंद कांबळे, उपसंचालक (प्रशासन) गोविंद अहंकारी यांच्यासह कोकण विभागाचे उपसंचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे उपस्थित होते.

पुस्तिकेची निर्मिती कोकण विभागीय माहिती कार्यालयाच्या सहाय्यक संचालक संजीवनी जाधव-पाटील, आणि उपसंपादक प्रविण डोंगरदिवे यांनी केली असून, या पुस्तिकेचे मुखपृष्ठ चित्रकार सुशिम कांबळे यांनी तयार केले आहे. ही पुस्तिका केवळ खाजगी वितरणासाठी उपलब्ध आहे.

# उरण महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन



**उरण : बातमीदार**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व गोपाळकृष्ण सार्वजनिक वाचनालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तरुण विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले गेले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळकृष्ण वाचनालयाच्या सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. ए. आर. चव्हाण (आय क्यु ए सी समन्वयक) हे होते. प्रमुख पाहुणे ज्येष्ठ गजलकार राजेंद्र नाईक यांनी विविध गझल सादर करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. ग्रंथालय समितीचे अध्यक्ष ॲड. पराग म्हात्रे यांनी ग्रंथालयाची संपूर्ण माहिती. संतोष पवार यांनी एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवनचरित्र व वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. तर ग्रंथपाल श्याम धारासुरकर यांनी आरोग्य व ग्रंथ यांचा सहसंबंध स्पष्ट केला.

या वेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या ग्रंथाचे प्रकट वाचन केले. प्रास्ताविक प्रा. ए.के गायकवाड यांनी केले तर आयोजक व्ही. एस इंदुलकर यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रचिती माळी (टीवाय बीकॉम) हिने केले. कार्यक्रमास ग्रंथालयाचे प्रथम सदस्य दत्तात्रय जुवेकर, माजी अध्यक्षा वैशाली कोळगावकर, ग्रंथपाल श्रीमती जिजा घरत, राजेश शहा, संचालक परेश मेश्री, चेतन वडके, अनुपमा कांबळे, डॉ. दत्ता हिंगमिरे ग्रंथालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# विद्युत विभागाचे टेंडर विशिष्ट ठेकेदारांसाठी; भाजपचा आरोप

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेच्या विद्युत विभागामार्फत आठ कोटी रकमेची विविध विद्युतीकरण आणि रोषणाई करणे आदी कामाचे टेंडर काढण्यात आलेले आहे. हे टेंडर बनविताना विशिष्ट ठेकेदारालाच काम कसे मिळेल याची पुरेपूर काळजी विद्युत विभागाने घेतली आहे. ज्यायोगे अन्य ठेकेदारांना वंचित ठेऊन जनतेच्या पैशाची उधळण करण्याचा मानस काही अधिकारांचा असून त्याप्रती असंतोषाची भावना जनतेमध्ये आहे, असा आरोप भाजप कार्यकर्ते ॲड. सचिन शिंदे यांनी मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांना दिलेल्या लेखी निवेदनात केला आहे.

टेंडरची मुदत वाढविण्यात यावी अशी मागणीही त्यांनी आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात केली आहे. नवी मुंबई महापालिका मार्फत वाशी येथील सार्वजनिक रुग्णालयातील विद्युतीकरण, पॅनल, पंखे बदलणे, तसेच पाम बीच मार्गवरील मोराज सर्कल ते नवी मुंबई महापालिका मुख्यालय दरम्यान दुभाजकांमधील झाडांना शोभिवंत रोषणाई करणे, सायन-पनवेल महामार्गावरील वाशी, नेरुळ आणि बेलापूर उड्डाणपुलाखालील सुशोभित विद्युत रोषणाई करणे या कामांचे चार वेगवेगळ्या निविदा काढण्यात आलेल्या आहेत.

या कामांची अंतिम मुदत १८ ऑक्टोबर २०२३ आहे. या कामांच्या निवेदाची मुदत वाढविण्यात यावी, नव्याने अटी व शर्ती शिथिल करून सदर निविदा स्पर्धात्मक व्हाव्यात जेणेकरून जनतेचा पैसाही वाचेल आणि कामही गुणवत्तापूर्ण होईल अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सचिन शिंदे यांनी मनपा आयुक्त राजेश नार्वेकर यांच्याकडे दिलेल्या निवेदनात केली आहे.



**उलवे नोड :** जय बजरंग कला, क्रीडा सांस्कृतिक मंडळ तसेच भाजप उलवे नोड २ आणि भाजप महिला मोर्चा उलवे नोड २च्या वतीने खारकोपर येथे नवरात्रोत्सव आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. सोबत विश्वनाथ कोळी, कैलास घरत उपस्थित होते. त्यांचे गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत यांनी स्वागत केले.





**पनवेल :** श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळ यांच्या वतीने झंकार नवरात्रोत्सवाला मंगळवारी भाजप शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, शहर खजिनदार संजय जैन, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका दर्शना भोईर, पवन सोनी, सोसायटी मित्र मंडळाचे अध्यक्ष सुमित झुंजाराव आदींनी विजेत्यांना बक्षीस देऊन गौरविले.





**पनवेल :** भाजप महिला मोर्चा तालुकाध्यक्ष रत्नप्रभा घरत यांनी कोपर येथील घरत परिवाराची कुलदैवत, जसखारची रत्नेश्वरी माता, गव्हाण गावची शांतादेवी (संतुबाय), द्रोणागिरी देवीचे दर्शन घेतले. या वेळी सरचिटणीस लीना पाटील, माजी ग्रामपंचायत सदस्य स्नेहलता ठाकूर, तालुका चिटणीस प्रणिता घरत आदी उपस्थित होत्या.





# खंडाळा घाटात पोलादी हाईट बॅरियर

## मोठ्या वाहनांचा शॉर्टकट बंद

**खोपोली : प्रतिनिधी**

खंडाळा घाटातून मुंबई-पुणे महामार्गावरून थेट खोपोली गावात उतरण्यासाठी शॉर्टकट असला तरी अवघड वळणामुळे थेट मृत्यूच्या दारात हा मार्ग मोठ्या वाहनांना कायमस्वरूपी बंद झाला आहे. या ठिकाणी पोलादी हाईट बॅरिअर बसवण्यात आले आहेत.

१५ एप्रिल रोजी मुंबई-पुणे महामार्गावर घाट उतरताना एका चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसून झालेल्या अपघातात १३ जणांना जीव गमवावा लागला होता, तर २८ जण गंभीर जखमी झाले होते. मोठ्या वाहनांना प्रवेश निषिद्ध असतानादेखील अनेक जण नियम पायदळी तुडवत असल्याने अपघात घडले होते. घाटातून थेट खोपोली गावात उतरण्यासाठी हा मार्ग शॉर्टकट असला तरी अवघड वळणामुळे थेट मृत्यूच्या दारात जात होता. अपघातांना कायमचा पायबंद बसावा यासाठी लोखंडी अँगलचे हाईट बॅरिअर बसवण्यात आले.

मुंबई-पुणे एक्स्प्रेसला घाटात मुंबई-पुणे महामार्ग जोडला जातो त्या ठिकाणी हाईट बॅरिअर तसेच खिंडीत हाईट बॅरिअर बसविण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर केवळ हलकी वाहने चारचाकी यांना मार्ग वापरता येणार आहे. अडीच मीटर उंचीची मर्यादा असतानाही पिकअप चालक, मालवाहतूक करणारे टेम्पो शॉर्टकटसाठी धोकादायक मार्गाचा वापर करत होते. लोखंडी अँगलचे बॅरियर डंपरने तोडून टाकले होते. कोणत्याही परिस्थितीत मोठ्या वाहनांना आळा बसावा यासाठी तुटलेल्या बॅरियरच्या जागी क्राँकिटचा भक्कम पाया करून त्यावर पोलादी बॅरियर बसविण्यात आले आहेत. महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, आयआरबी आणि वाहतूक पोलीस यंत्रणा यांच्या पुढाकाराने हाईट बॅरिअर बसवण्यात आले.



## माणगाव पोलिसांनी हरविलेल्या बालकाला पालकांकडे केले सुपूर्द

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव पोलिसांनी कौतुकास्पद कामगिरी करीत हरविलेल्या अडीच वर्षीय मुलाचा शोध घेतला आणि सुखरूपपणे पालकांच्या ताब्यात दिले. याबद्दल पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे अभिनंदन होत आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की, १७ ऑक्टोबर रोजी रात्री राहुल बेचैन गुप्ता (वय ३२, रा. माणगाव) त्यांचा मुलगा जिगर राहुल गुप्ता हा रात्री ९.३० वाजता घरातून हरवला असल्याची तक्रार देण्याकरिता माणगाव पोलीस ठाणे येथे आले होते. घटना कळताच निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथक तयार करून हवालदार जाधव, शिपाई रामनाथ डोईफोडे, मयूर पाटील, सोनकांबळे, साबळे असे हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यासाठी तत्काळ रवाना झाले. जिगर गुप्ता रात्री १०.१५ वाजता माणगाव एसटी बसस्थानक येथे मिळून आला. ही माहिती समजताच आई-वडिलांचे आनंदाश्रू वाहू लागले. या मुलास माणगाव पोलीस ठाणे येथे आणून त्याच्या आई-वडिलांकडे देण्यात आले.


## CHANGE OF NAME

I Kushindra Janu Mhatre, declares that my name as per Aadhar card is Kushindra Janu Mhatre, my son's name as per Aadhar card reads as Meghraj Kushindra Mhatre, and my wife's name as per Aadhar card reads as Yashoda Kushindra Mhatre, which is true and final.

Sign. by New Name
**Kushindra Janu Mhatre**


## मोरे महाविद्यालयात परीक्षेबाबत व्याख्यान

**रोहे : प्रतिनिधी**

एम. बी. मोरे फाउंडेशन संचलित कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालयात पदवी अभ्यासक्रम परीक्षांच्या पूर्वतयारीकरिता वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनीसाठी मार्गदर्शनपर व्याख्यान आयोजित केले गेले होते.

रोहा येथील डॉ सी. डी. देशमुख महाविद्यालयाचे सहाय्यक प्रा. डॉ. सम्राट जाधव यांना व्याख्यानाकरिता निमंत्रित केले होते. त्यांनी वाणिज्य शाखेच्या विद्यार्थिनींना फिनान्शियल अकाउंटिंग या विषयावर मार्गदर्शन केले. याचा लाभ महाविद्यालयातील विद्यार्थिनींनी घेतला.

## नंदिनी भोईर, हिमानी घरत यांची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील मजगाव येथील नाज अकॅडमी हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयाच्या नंदिनी महेंद्र भोईर व हिमानी गजानन घरत यांनी रसायनी येथील पिल्लई एचओसी स्कूलच्या मैदानावर झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी खेळात यशस्वी कामगिरी केली. त्यामुळे त्यांची मुंबई विभागासाठी निवड करण्यात आली आहे

१९ वर्षीय मुलींच्या भालाफेक स्पर्धेत नंदिनी भोईर हिने, तर चारशे मीटर अडथळा शर्यतीत हिमानी घरतने उत्कृष्ट कामगिरी केली. विद्यालयाचे क्रीडा शिक्षक आशिष बुल्लु यांनी त्यांना मार्गदर्शन केले. या यशाबद्दल विद्यालयाच्या संचालक मंडळाचे अध्यक्ष शफी हसन तांडेल, सचिव वसीम तांडेल, इतर पदाधिकारी, मुख्याध्यापिका मेघा भंडारे, सर्व शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## जितेंद्र पाटील यांना जीवनगौरव पुरस्कार

**पाली : प्रतिनिधी**

सेवानिवृत्त औषधनिर्माण अधिकारी जितेंद्र गजेंद्र पाटील यांना त्यांच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल राज्य औषध निर्माण अधिकारी संघटना रायगडतर्फे जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला.

रायगड जिल्हा परिषद प्रशासकीय अधिकारी डॉ. रोशन पाटील व जिल्हा आरोग्य खाते संघटनेचे अध्यक्ष निलेश कार्लेकर यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. जितेंद्र पाटील हे नुकतेच पोयनाड येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातून सेवानिवृत्त झाले आहेत.


## स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व फेर लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रू. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. किनारा को. ऑप. हौ. सोसायटी लि. प्लॉट नं. बी १/४, बावन बंगला, पनवेल. | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फायनल प्लॉट नं. ५२१ / २ वर बांधलेली किनारा को. ऑप. हौसिंग सोसायटी मधील फ्लॅट नं. सी./३/२. तळमजला ज्याचे क्षेत्र ५९३.३२ चौ. फुट. बिल्टअप | ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप | ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप | — | मंगळवार दि : ३१/१०/२०२३ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६, मारुती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

टिप- १) फेर लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) फेर लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ४४,३३,३३६/- (अक्षरी रूपये चव्वेचाळीस लाख तेहतीस हजार तीनशे छत्तीस मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण : पनवेल**
**दिनांक १८/१०/२०२३**

संस्थेचा शिक्का

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**



## स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव

तमाम लोकांना जाहीर करण्यात येते की, कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेचे खालील नामनिर्देशित केलेले सभासद थकबाकीदार आहेत. त्यांचेकडील थकबाकीची रक्कम वसुल करणेसाठी त्यांच्या खालील स्थावर मिळकतीचा जाहीर फेर लिलाव त्याचे नावासमोर दर्शवलेल्या वेळी, रोजी, ठिकाणी होणार आहे. तरी, ज्यांना सदर मिळकतीच्या लिलावात बोली बोलून घ्यावयाची असेल त्यांनी संस्थेशी संपर्क साधून मिळकतीची प्रत व ठिकाण पाहून घ्यावे व फेर लिलावाच्या दिवशी व वेळी उपस्थित रहावे.

| अ. नं. | थकबाकीदाराचे नाव व पत्ता | मिळकत नं व गट नं. ठिकाण | क्षेत्र हे. आर. | लिलाव करावयाचा हिस्सा | आकार रू. पै. | लिलावाची तारीख, वेळ व ठिकाण |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो. लि. बावन बंगला, पनवेल या इमारतीमधील ब्लॉक नं. १. तळमजला, बी / २ विंग, क्षेत्र ४२०.३४ चौ. फुट. | क्षेत्र ४२०.३४ चौ.फुट | क्षेत्र ४२०.३४ चौ.फुट | | मंगळवार दिः ३१/१०/२०२३ वेळ: सकाळी ११.०० ते दुपारी १२.०० वाजता. कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल रो हाऊस, प्लॉट १, ६२६,मारूती अपार्टमेंट पनवेल ४१०२०६. |

टिप- १) फेर लिलावाचे अटी व शर्तीचे वाचन लिलावाचे वेळी करण्यात येईल.
२) फेर लिलावापूर्वी कर्ज खाते बंद झाल्यास लिलाव रद्द केला जाईल.
३) येणे रक्कमेचा विचार करून मालमत्तेची विक्री केली जाईल.
४) कोणतेही कारण न दाखवता लिलाव मंजूर अगर नामंजूर करणे व पुढे ढकलणे याबाबतचे अधिकार खालील सही करणार यांनी राखून ठेवला आहे.
५) अपसेट व्हॅल्यू रू. ३७,६८,९९१ /- (अक्षरी रूपये सदोतीस लाख अडुसष्ठ हजार नऊशे एक्यान्नव मात्र) याचे वरती बोली करावी लागेल.

**ठिकाण: पनवेल**
**दिनांक १८/१०/२०२३**

संस्थेचा शिक्का

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**



## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची फेर जाहीर नोटीस

जा.क. २९/४११/२३-२४ वसुली स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १८/१०/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी अधिक व्याज रक्कम रू. ३८,९५,९७८/- (अक्षरी रूपये अडोतीस लाख पंच्यान्नव हजार नऊशे अठ्याहत्तर मात्र) येणेपोटी श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी./१/८, किनारा को ऑप. हौ. सो., पनवेल, ता- पनवेल, जि-रायगड यांची खाली नमुद केलेली मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विकीमुळे उद्‌भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर व श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर रा. फ्लॅट नं. बी/१/८, किनारा को.ऑप. हौ. सो., पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ३१/१०/२०२३ रोजी ठिक ११.०० ते १२.०० या वेळेत कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं. ५२१/२ वरील किनारा को. ऑप. हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला, ५९३.३२ चौ.फुट बिल्टअप या मिळकतीचे जाहीर लिलावाने फेर विक्री करतील.

या अगोदर जा.क्र. २९/३४७ वसुली-स्थावर जाहिरनामा वसुली अधिकारी यांचे कार्यालयाकडून दि. १४/०९/२०२३ रोजी वरील स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहिर नोटीस देण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. ३०/०९/२०२३, शनिवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत सदर मालमत्तेचा जाहिर लिलाव ठरविण्यात आला होता परंतु या जाहिर लिलाव प्रक्रियेत कोणीही खरेदीदार हजर नसल्याकारणांने आज रोजीचा (दि. ३०/०९/२०२३) जाहीर लिलाव तात्पुरता स्थगित करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुढील फेर लिलावाची तारीख १६/१०/२०२३, सोमवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत होणार आहे. याची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

तसेच मंगळवार दिनांक ३१/१०/२०२३ रोजीची लिलावाची तिसरी व अंतिम प्रक्रिया सकाळी ११ ते १२ या वेळेत होईल

### स्थावर मिळकतीचा तपशील

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकाराविरूध्द प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क. ६७ २०१८-१९ जा.क्र. २६९८ /सहानि/ पनवेल / ता. १६/०५/२०१९ पनवेल/बी. ५/क. १०१ सन २०१८-१९ | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्री. किरण पांडुरंग सावळेकर | पनवेल महानगर पालिका, पनवेल ता. पनवेल, जि. रायगड | मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील बावन बंगला येथील फायनल प्लॉट नं.५२१ / २ वरील किनारा को. ऑप. हौ. सो. लि. मधील फ्लॅट नं. सी ३/२, तळमजला. | ५९३.३२ चौ. फुट बिल्टअप ही मिळकत | — | श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विकी आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रू. ३९,१६,४२८/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विकीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क. वसुली स्थावर जप्ती - दिनांक १५/०२/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक १८/१०/२०२३**

संस्थेचा शिक्का

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**



## जप्त केलेल्या व ताबे कब्जात असलेल्या स्थावर मालमत्तेच्या विक्रीची फेर जाहीर नोटीस

जा.क. २९/४१२/२३-२४ वसुली स्थावर जाहीरनामा
वसुली अधिकारी यांचे कार्यालय
दिनांक : १८/१०/२०२३

ज्या अर्थी कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल या संस्थेच्या कर्जाची थकबाकी रक्कम अधिक व्याज रू. ३८,२३,९५१ /- (अक्षरी रुपये अडोतीस लाख तेवीस हजार नऊशे एकावन्न मात्र) येणेपोटी श्री. लक्ष्मण मनु चेहरा रा. लोटस बिल्डिंग, ए विंग, ५ वा मजला, रूम नं. ५०२, चॅनल उपवन जवळ, साईनगर, पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड यांनी त्यांच्या कर्जापोटी तारण दिलेली श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व श्रीमती ज्योती किरण कल्याणकर यांची किनारा को. ऑप. हौ. सोसायटी मधील फ्लॅट नं. बी. २. तळमजला, प्लॉट नं. ५२१/१, २. सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को ऑप. हौ. सो., पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड ही मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. ज्या अर्थी सदरील रक्कम जप्तीमुळे व विक्रीमुळे उद्भवणाऱ्या कायदेशीर भार व खर्च वसुली करीता उक्त मालमत्ता जाहीर लिलाव पध्दतीने विकणे आवश्यक वाटल्यावरून अशी नोटीस देण्यात येते की, सदर श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर व सौ. ज्योती किरण कल्याणकर, रा. फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१/१ २. सब प्लॉट नं. २७ ते ३५. किनारा को. ऑप. हौ. सो. पनवेल, ता-पनवेल, जि-रायगड यांनी उक्त स्थावर व तिच्यापासून मिळणारा भोगवटा व तिची अगर त्यामधील काही भागाची विल्हेवाट लावून मिळणारा लाभांश या सर्व प्रकारच्या हक्कांचा सोबत जोडलेल्या लिलावाच्या अटी व शर्तीस व ठरविलेल्या किंमतीस (अपसेट प्राईज) यांना अधिन राहून जास्तीत जास्त बोली बोलणाऱ्यास दि. ३१/१०/२०२३ रोजी ठिक ११.०० ते १२.०० या वेळेत कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित पनवेल चे कार्यालय श्री. सुनिल सदानंद गद्रे वसुली अधिकारी हे मौजे पनवेल महानगर पालिका हद्दीतील फ्लॅट नं. बी. २, तळमजला, प्लॉट नं. ५२१ / १, २, सब प्लॉट नं. २७ ते ३५, किनारा को. ऑप. हौ. सो., पनवेल, या मिळकतीचे जाहीर फेर लिलावाने विक्री करतील.

या अगोदर जा.क्र. २९/३४७ वसुली-स्थावर जाहिरनामा वसुली अधिकारी यांचे कार्यालयाकडून दि. १४/०९/२०२३ रोजी वरील स्थावर मालमत्तेच्या विक्रीची जाहिर नोटीस देण्यात आली होती. त्याप्रमाणे दि. ३०/०९/२०२३, शनिवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत सदर मालमत्तेचा जाहिर लिलाव ठरविण्यात आला होता परंतु या जाहिर लिलाव प्रक्रियेत कोणीही खरेदीदार हजर नसल्याकारणांने आज रोजीचा (दि. ३०/०९/२०२३) जाहीर लिलाव तात्पुरता स्थगित करण्यात आलेला आहे. त्यामुळे पुढील फेर लिलावाची तारीख १६/१०/२०२३, सोमवार रोजी सकाळी ११ ते १२ या वेळेत होणार आहे. याची सर्वांनी कृपया नोंद घ्यावी.

तसेच मंगळवार दिनांक ३१/१०/२०२३ रोजीची लिलावाची तिसरी व अंतिम प्रक्रिया सकाळी ११ ते १२ या वेळेत होईल.

### स्थावर मिळकतीचा तपशील

| अ. क्र. | वसुली दाखला क्रमांक व दिनांक | ज्या पक्षकार विरूध्द प्रमाणपत्र देण्यात आले असेल त्याचे नाव | गावाचे नाव व तालुका | गट नं. | क्षेत्र | आकारणी | कब्जेदार सदरी असणारे नाव | हक्क | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | दावा क. १०९ २०१७/१८ | श्री. लक्ष्मण मनु चेहरा श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर श्री. कृष्णा बालाजी आवराळे | पनवेल | पनवेल महानगर पालिका हद्दीतील प्लॉट नं. ५२१/१,२ सब प्लॉट नं २७ व ३५ वरील किनारा को. ऑप. हौ. सो. लि. फ्लॅट नं. २. तळमजला, बी. २ | ४२०. ३४ चौ. फुट कारपेट | | श्री. किरण दत्तात्रय कल्याणकर श्रीमती ज्योती किरण कल्याणकर | नाही | |

उक्त मालमत्तेसंबंधी अन्य कोणत्याही व्यक्तीने प्रतीपादन करण्यात आलेला त्याचा मालकी हक्क भार अगर हितसंबंध याबाबतच्या खरेपणाची कसलीही हमी देण्यात येणार नाही. विक्री आदेश काढण्यात आलेल्या तारखेस थकबाकीदाराकडून देणे असलेली येणे बाकी अधिक व्याज रू. ३८,४३,४६०/- अधिक सरचार्ज व इतर खर्चाच्या वसुलीसाठी विक्रीचा आदेश देण्यात आला आहे.

वसुली अधिकारी श्री. सुनिल सदानंद गद्रे यांनी उक्त मालमत्ता यापूर्वीच जप्ती आदेश क. वसुली स्थावर जप्ती - दिनांक २७/०१/२०२३ अन्वये जप्त केली आहे.

**स्थळ : पनवेल**
**दिनांक १८/१०/२०२३**

संस्थेचा शिक्का

**सही/-**
**सुनिल सदानंद गद्रे**
**वसुली अधिकारी**
**कमळ महिला नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, पनवेल**


रत्नेश्वरी, जसखार, उरण



डोंबिवली : राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित नमो रमो नवरात्रोत्सवाला आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी भेट देत देवीचे दर्शन घेतले.



## नवरात्रीचे नवरंग (रंग : निळा)


सीआरपी ग्रुप सावरखार, उरण


नवी मुंबई महापालिका मुख्यालयातील स्विय सहाय्यक


सह्याद्री दर्शन सोसायटी, नेरूळ


सीकेटी विद्यालय पूर्व प्राथमिक विभाग, नवीन पनवेल


नवी मुंबई महापालिका नगरसचिव विभाग


न्यू इंग्लिश स्कूल मार्केड यार्ड, पनवेल


जागर भक्तीचा ग्रुप, से. ३४, कामोठे


अभ्युदय बँक स्टाफ, खांदा कॉलनी शाखा, पनवेल


फुंडे (उरण) हायस्कूल शिक्षिकावृंद


नवी मुंबई महापालिका लेखा परीक्षण विभाग


रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा न्यायालय अलिबाग


ज्ञानस्त्रोत केंद्र, जवाहरलाल नेहरू ग्रंथालय, मुंबई विद्यापीठ


नवी मुंबई महापालिका शाळा क्र.४९, ऐरोली


नवी मुंबई महापालिका शाळा, तुर्भे गाव


नवी मुंबई महापालिका शाळा क्र. ३५, कोपरखैरणे

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com